ऑगस्ट २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५२
वर्ष ७७वे, पुष्प १ले
आषाढ-श्रावण
शके १९४८

सन्मति प्रकाशन

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07
बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

UGC-CARE Listed Research Journal (Since-Jun2019)
मूल्य – १८ रु.

## शोध-महाराष्ट्रातील पाले व लोहगडवाडी येथील आद्य जैन लेणींचा !







## श्री बाहुबली क्षेत्रावरील महामस्तकाभिषेकाची उद्घोषणा..... क्षणचित्रे..



रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी कुंभोज येथे बाहुबली अतिशय क्षेत्रावर प्रत्येक बारा वर्षानंतर येणारा महामस्तकाभिषेक आता दि. ८ जानेवारी ते दि. १३ जानेवारी २०२७ या दरम्यान होत आहे, अशी उद्घोषणा करून युवा आचार्य १०८ श्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांचे मंगल सान्निध्य लाभावे आणि नांदणीचे स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक महास्वामीजींचे पावन निर्देशन मिळावे या करिता श्रीफळ अर्पण करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाशरावजी आवाडे अण्णा, महामंत्री श्री. डी. सी. पाटील, विद्यापीठाचे कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब पाटील, संचालक श्री. गोमटेश बेडगे, आश्रमचे कोषाध्यष डॉ. बाळासाहेब चोपडे व इतर पदाधिकारी


---



## श्री. राजाभाऊ डोणगावकर यांना विदर्भरत्न पुरस्कार २०२६

रिसिल डॉट इन या सुप्रसिद्ध संस्थेकडून नागपूर येथे दि. १९ जुलै २०२६ रोजी सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या शुभ हस्ते २०२६ या वर्षीचा विदर्भरत्न हा पुरस्कार श्री महावीर ब्रह्मचर्याश्रमचे विश्वस्त व गुरुदेव समंतभद्र प्राथमिक विद्यामंदिर, कारंजा या प्रशालेचे चेअरमन श्री. राजाभाऊ डोणगावकर यांना देण्यात आला. तसेच ते कारंजा नगरी सहकारी पतसंस्था मर्यादित, कारंजा (लाड) या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. सहकार क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे, उत्कृष्ट व्यवस्थापनामुळे आणि सभासदाभिमुख कार्यपद्धतीमुळे संस्थेची उल्लेखनीय प्रगती साधली आहे. समाजहित, आर्थिक सक्षमीकरण आणि सेवाभावी कार्यातील आपल्या मोलाच्या योगदानाचा गौरव म्हणून हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान संपूर्ण समाजासाठी तसेच सहकार क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. आपणास उत्तम आरोग्य, निरंतर यश आणि समाजसेवेच्या कार्यात अशीच उत्तरोत्तर प्रगती लाभो, हीच मंगलकामना. आपणांस प्राप्त झालेल्या पुरस्काराबद्दल आपले मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन!

सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद




प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम्।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११०

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

**ऑगस्ट २०२६** ❍ **वर्ष: ७७वे** ❍ **पुष्प १ले**

❍ **कार्यकारी संपादक** ❍
❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री** ❍
एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **संपादक मंडळ** ❍
❍ **श्री. गोमटेश बेडगे,** एम.ए., बी.एड्.
❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.
❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.
❍ **श्री. प्रदीप धोतरे,** शास्त्री, एम.ए., बी.एड्.

**बँक खात्याचे विवरण –** ❑ **वार्षिक वर्गणी :२५०/–** ❑ **द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/–**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388
Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

(अंकातील विचाराशी सन्मति-मासिक परिवार सहमत असेलच असे नाही.)

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✻ संपादकीय.. बाहुबलीतील महामस्तकाभिषेकाची उद्घोषणा – डॉ. नेमिनाथ शास्त्री ०४
✻शोध : महाराष्ट्रातील पाले व लोहगडवाडी येथील आद्य जैन लेणींचा!
– श्री. ओशिन बंब, डॉ. श्रीकांत गणवीर ०८
✻ योगसार चिंतन (पुष्प १६) – प्रियदर्शन जैन १३
✻ सोलहकारण भावना भाय....! (लेखांक १६) –हर्षा वेखंडे, नागपूर १६
✻ पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ (लेखांक – ३१) –विपुल खेडकर, नागपूर १९
✻ अहिच्छत्र पार्श्वनाथ... ? – डॉ. स्वयंप्रभा पाटील, सांगली २४
✻ पुस्तक समीक्षण– दिवास्वप्न (श्री. गिजूभाई बधेका ) – श्री उद्धर अशोक चवरे,कारंजा २९
✻ विचारांचे जीवाणू आणि विषाणू - Dr. Chandrasekhar Bode ३१
✻ तत्त्वार्थसूत्र महिमा (कविता) – श्री. सुदर्शन टोपरे, अंजनगाव सुर्जी ३२
✻ जैन साहित्य में ध्यान, योग और आत्म स्थिरता – डॉ. वन्दना (शिक्षाविद्), दिल्ली ३३
✻ प. पू. आचार्य १०८ श्री वर्धमानसागरजी महाराज (दक्षिणवाले) समाधी –डॉ. नेमिनाथ शास्त्री ३८
८एका रात्रीत वडील, मामा, आजोबा गमावले तरीही बनल्या एसीपी
– दिनेशकुमार ऐतवडे ३९
✻ विशेष वार्ता ४१

## संपादकीय....

# बाहुबली क्षेत्रावरील महामस्तकाभिषेकाची उद्‌घोषणा

डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली

**✻ श्रमणयुगप्रवर्तकांच्या जीवनातील अंतिम शुभ संकल्प–**

विसाव्या शतकातील श्रमणयुगाचे प्रवर्तक चारित्रचक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागरजी महाराज यांनी १९५५ साली कुंथलगिरी सिद्धक्षेत्रावर समाधी महोत्सव साजरा केला. तत्पूर्वी दक्षिण महाराष्ट्रात विहार करीत असताना त्यांना असे जाणवले की मार्च १९५३मध्ये श्रवणबेळगोळ येथील गोम्मटेश्वर बाहुबली भगवंतांचा महामस्तकाभिषेक संपन्न झाला. या सातिशय जिनधर्माच्या प्रभावानेकरिता अनेक विद्वान व भक्तगणांनी उपस्थिती दर्शविली. विशेष करून उत्तर भारतातील अनेक धनिक व व्यापारी वर्ग हा मस्तकाभिषेकाचा सोहळा पाहून आचार्यश्रींचे दर्शन करून परत आपल्या गावी जात होता. परंतु दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी वर्गातील श्रावक–श्राविका या छोट्याशा क्षेत्राच्या दर्शनाकरिता देखील अनेक दिवस घरातून बाहेर पडू शकत नव्हते, कारण रेल्वे, बस अशा दळणवळणाची साधने देखील खूप अपुऱ्याच होत्या. त्यामुळे प्रवासास कित्येक दिवस लागत असत. सामान्य वर्गातील व शेतकरी कुटुंबातील लोक शेती, जनावरे इत्यादी सोडून बराच काळ घराबाहेर राहू शकत नव्हते. असे हे सर्व भव्यजीव तीर्थयात्रेच्या पुण्यापासून वंचित राहत होते. त्यामुळे आचार्यश्रींच्या मनात असा विकल्प येत होता की एखादे छोटे श्रवणबेळगोळ या आपल्या भागातच का असू नये? हे कार्य कोण करू शकेल? कोणामध्ये इतकी योग्यता आहे? आपण तर आता सल्लेखना साधाण्याचा पवित्र शुभ संकल्प केला आहे असे अनेक प्रश्नचिन्ह त्यांच्या मनात घोळत होते.

पुण्यपुरुषांच्या पवित्र संकल्पाच्या सिद्धीसाठी देखील निमित्त सहजच उपस्थित राहतात. योगायोगाने बाहुबली गुरुकुलात गुरुवार दि. १ एप्रिल व शुक्रवार दि. २ एप्रिल १९५४ रोजी रथयात्रा, मौजीबंधन आणि वसतीगृहावरील नूतन भव्य इमारतीचा उद्‌घाटन समारंभ असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या धर्मोत्सवाकरिता आचार्यश्रींना मंगल आमंत्रित करण्यात आले होते. परंतु आचार्यश्रींनी आपल्या वृद्धापकाळच्या शारीरिक कमतरतेमुळे कुंथलगिरी–कडे विहार करीत असल्याचे सांगून ते आमंत्रण स्वीकारले नव्हते. तेव्हा आचार्यश्रींचे वय वर्ष ८३ इतके होते.

शेडबाळ, सांगली या मार्गे विहार करून नांद्रे येथे पोहोचले होते. सकाळच्या सामायिक प्रसंगी त्यांच्या अंत:करणात तो पवित्र भाव पुन्हा उफाळून आला. गुरुवार दि. १ एप्रिल १९५४ रोजी मंगल प्रभाती भक्तिपाठप्रसंगी एका विशिष्ट निर्णयाला येऊन पोहोचले आणि एकाएकी श्री अतिशय क्षेत्र बाहुबलीकडे आपले पाय वळविले. हा हा म्हणता ही मंगल वार्ता विजेप्रमाणे सर्वत्र पसरली. वाटेतील प्रत्येक खेड्यातील भक्त–जनता त्यांच्या स्वागतासाठी गर्दी करत होती आणि विश्रांतीसाठी विनंती करीत होती. परंतु कोठेही न थांबता समडोळी येथे आहारासाठी पोहोचले. ब्रह्मचारी जिनदासजी यांच्याकडून बाहुबली क्षेत्रावर आचार्यश्रींचा विहार होत आहे अशी अनपेक्षित बातमी येऊन पोहोचली. बाहुबली क्षेत्रावरील सर्व विश्वस्त समडोळी येथे पोहोचले. आचार्यश्रींनी सामायिक संपताच बाहुबलीकडे विहार केला. अशाप्रकारे नांद्रे ते बाहुबली हे सुमारे १७ मैलाचे अंतर आचार्यश्रींनी वयाच्या ८३व्या वर्षी देखील प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर एका दिवसात हा हा म्हणता तोडले. खरोखर

आचार्यश्रींना विविध धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने उपस्थित जनसमुदायासमोर आपल्या मनातील शुभ संकल्प व्यक्त करण्याची उत्कट इच्छाशक्ती होती. हा मुहूर्त त्यांना साधावयाचा होता.

दि. १ एप्रिल १९५४ रोजी सरळ बाहुबली क्षेत्रावर प्रवेश न करताच क्षेत्राबाहेरील एका शेतात उतरले. तेथे गुरुदेव श्री समंतभद्र महाराज स्वागतास पोहोचले. तेथेच चर्चेनंतर आचार्यश्री म्हणाले, 'या पवित्र क्षेत्रावर एक विशाल काय मनोज्ञ गोम्मटेश्वर बाहुबली भगवंतांची महामूर्ती विराजमान व्हावी म्हणजे एखाद्या महान कल्पवृक्षाचे बीजारोपणच होय.' गुरुदेवश्री समंतभद्र महाराजांनी या महान शुभ संकल्पाचे भद्रस्मित हास्यपूर्वक स्वागत करताना उद्गारले, 'आपल्यासारख्यांचे पुण्यमय आशीर्वाद छत्र व भावनाबल असल्यानंतर यात अशक्य ते काय?'

या अभिवचनानंतर आचार्यश्रींनी बाहुबली क्षेत्रावर प्रवेश केला आणि दुसऱ्या दिवशी दि. २ एप्रिल १९५४ रोजी उपस्थित विशाल समुदायाला संबोधित करीत असताना अशी भावना व्यक्त केली की, 'मी आज जे येथे आलो ते येथील उत्सवासाठी नसून माझ्या अंतरीची इच्छा व्यक्त करण्यासाठी आलो आहे. मला असे वाटते की हे बाहुबली क्षेत्र दक्षिणेतील दुसरे श्रवणबेळगोळ बनावे. किमान २५ फूट उंच असणारी महामूर्ती येथे उभारली जावी. आणि त्याचबरोबर या गुरुकुल परिसराचा विकास व्हावा. येथे हजारो विद्यार्थी गुरुकुलाच्या माध्यमातून जिनसंस्कार प्राप्त करावेत, अशी आमची मंगल भावना आहे. या महामूर्तीच्या पवित्र छत्रछायेखाली जिनधर्माचे निरंतर अध्ययन होत रहावे. दक्षिण भारतातील हे एक विशाल सांस्कृतिक केंद्र बनेल.'

त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे रविवार दि. ४ एप्रिल १९५४ रोजी संपूर्ण वर्षातील अत्यंत शुभ दिवस म्हणून गणला जाणारा चैत्रशुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडवा हा शुभमुहूर्त होता. या शुभमुहूर्तावरच आचार्यश्रींच्या मंगल सानिध्यातच या महामूर्तीच्या शुभ संकल्पाचा आविष्कार झाला आणि या विशाल प्रतिमेच्या उभारणीस दानराशी संकलित करण्याचा शुभ मुहूर्त साधण्यात आला.

१९६३ साली या महामूर्तीची उभारणी पूर्ण झाली आणि पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव संपन्न झाला. या महामूर्तीच्या उभारणीस सुमारे दोन लाखाहून अधिक रुपये खर्च आला होता. यामध्ये सर्वांनी ११०१ रुपये इतकी जास्तीत जास्त दानराशी दिली होती, परंतु या दानराशीच्या संकलनात सुरुवात करीत असतानाच नांदणीचे तत्कालीन भट्टारक स्वस्तिश्री जिनसेन महास्वामी यांनी रुपये ११,१११ इतकी विशाल बृहद्दानराशी देऊ केली होती. या प्रचंड कार्याची प्रचिती येण्यासाठी किंवा या कल्पनातीत कार्याच्या भाववासनेकरिता पुढील प्रमाणे गणित मांडावे लागते. शक्यतो कालानुरूप रुपयांचे मूल्यांकन करीत असता सोन्याचा भाव पहावा लागतो. त्यानुसार विचार केले असता १९६३ साली दहा ग्रॅम (एक तोळा) सोन्याचे बाजारभाव रुपये ९७ इतके होते. म्हणजेच आज त्याचे मूल्य पाहिल्यास सुमारे ३० कोटीहून अधिक रुपये या महामूर्तीच्या उभारणीस खर्च आला होता..

जिज्ञासू लोकांनी या विश्व मनोज्ञ महामूर्तीच्या उभारणीचा इतिहास अवश्य वाचावा. याकरिता **मकराना ते बाहुबली : एका अथक परिश्रमाची रोचक यशोगाथा** हे पुस्तक आवर्जून वाचावे.

**❊ पहिला महामस्तकाभिषेक– (१९६३)**

गुरुवार दि. ३१ जानेवारी ते शुक्रवार दि. ८ फेब्रुवारी १९६३ या कालावधीत पहिला महामस्तकाभिषेक संपन्न झाला. या प्रतिष्ठा महोत्सव प्रसंगी गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे पावन निर्देशन लाभले. तर सुप्रसिद्ध परमपूज्य १०८ आचार्य श्री देशभूषणजी महाराज, परमपूज्य आचार्य श्री अनंतकीर्ती महाराज, परमपूज्य मुनिश्री नेमिसागरजी महाराज, परमपूज्य मुनिश्री आदिसागरजी महाराज, परमपूज्य मुनिश्री आर्यनंदी महाराज, स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक, स्वस्तिश्री

लक्ष्मीसेन भट्टारक इत्यादी अनेक मुनी–त्यागी, आर्यिका यांचे मंगल सानिध्य लाभले.

हा मस्तकाभिषेक अत्यंत वैविध्यपूर्ण, वैशिष्ट्यपूर्ण आणि परिसरात निरंतर चर्चेचा राहिल असाच घडला. त्याशिवाय जैन वैद्य संमेलन, बाहुबली जैन मंदिरासमोरील मानस्तंभ, शाळेच्या नूतन इमारतीचे उद्‌घाटन, आचार्यश्री शांतिसागर प्रवचन हॉल या विशाल भवनाची पायाभरणी असे अनेक संस्मरणीय उपक्रम घडले. तर शाळेच्या भव्य प्रवेशद्वाराचे उद्‌घाटन तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. दादासाहेब कन्नमवार यांच्या शुभहस्ते झाले. तर साहू शांतिप्रसाद जैन यांच्या शुभहस्ते शाळेच्या विशाल इमारतीचे उद्‌घाटन झाले. याशिवाय अनेक मान्यवर या महोत्सवास उपस्थित होते.

*** दुसरा महामस्तकाभिषेक– (१९७०)**

दि. १९ फेब्रुवारी १९७० ते दि. २७ फेब्रुवारी १९७० या दरम्यान हा दुसरा महामस्तकाभिषेक संपन्न झाला. यावेळी भारतातील प्रसिद्ध पाच निर्वाणक्षेत्रांची प्रतिष्ठा येथे करण्यात आली. पंचनिर्वाणभूमी पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव सानंद संपन्न झाला. त्यासोबत विविध व्याख्यानमाला व कार्यक्रम ही आयोजित करण्यात आले होते. भारतातील जगप्रसिद्ध जैन विद्वान पंडित श्री. जगन्मोहनलालजी, पंडित श्री. फुलचंद सिद्धांत शास्त्री, पंडित श्री. कैलासचंदजी, पंडित श्री. दरबारीलाल कोठीया, विद्याभूषण के. भुजबली शास्त्री, पंडित श्री. पद्मनाभ म्हैसूर, पंडित श्री. खुशालचंद गोरावाला, डॉ. ए. एन. उपाध्ये यासारखे विद्वान उपस्थित होते. या सर्वांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

या महोत्सवाची खास विशेषता म्हणजे भारतगौरव आचार्यश्री देशभूषण महाराज, मुनिश्री विमलसागरजी महाराज अशा प्रकारे एकूण ११ महाराज, ३ ऐलक, ९ आर्यिका, १६ क्षुल्लिका, २४ क्षुल्लक, नांदणी व कोल्हापूरचे भट्टारक अशाप्रकारे **एकूण ६५ त्यागी उपस्थित होते. बाहुबली संस्थेच्या इतिहासात इतक्या मोठ्या प्रमाणात एकत्रित येणाऱ्या त्यागीगणांचा हा एकमेव प्रसंग असावा.**

या सर्व त्यागीगणांना पाहून मंगल प्रवचनप्रसंगी आचार्यश्री देशभूषण महाराज गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांना उद्देशून संपूर्ण सभेस म्हणाले की, 'इतका विशाल त्यागी समूह पहिल्यांदाच एकत्रित आला आहे. यासाठी गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांची विशाल दृष्टी लाभली आहे. त्यांच्याकडे विशेष नेतृत्व गुण आहे. त्यामुळे आम्ही त्यांना आदेश करीत आहोत की आता त्यांनी आचार्यपद स्वीकारावे.' तेव्हा गुरुदेवश्री समंतभद्रजी महाराज स्मितहास्य करीत उद्गारले की, 'आपल्या सर्वांच्या महान व उदात्त अंत:करणाचे हे द्योतक आहे, यात शंका नाही. पण आम्ही आचार्यपद स्वीकारण्यास योग्य नाही, कारण संयम स्वीकारणे आणि संयमाचे पालन करवून घेणे यात महान अंतर आहे. आपल्या सर्वांच्या या उदात्त भावनेचा आम्ही नम्रतेने आदर करीत आहोत, पण आम्हास आचार्यपद न दिले तर बरे होईल.' यातूनच खरोखर गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांचे विशाल अंत:करण आणि नम्रता सहजतेने कळते.

*** तिसरा रौप्यमहोत्सवी महामस्तकाभिषेक (१९८९)–**

शुक्रवार दि. २१ एप्रिल १९८९ ते रविवार दि. २३ एप्रिल १९८९ अखेर भगवान बाहुबली महामूर्तीचा रौप्यमहोत्सवी महामस्तकाभिषेक आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रसंत आचार्यश्री विद्यानंद महाराज, परमपूज्य मुनिश्री महाबल महाराज, पूज्य क्षुल्लकश्री वीरभद्र महाराज आदी मुनी व त्यागीगणांचे सानिध्य लाभले होते.

*** चौथा महामस्तकाभिषेक (२००१)**

दि. ८ फेब्रुवारी ते दि. १३ फेब्रुवारी २००१ या कालावधीत हा मस्तकाभिषेक संपन्न झाला. परमपूज्य मुनी १०८ श्री सुमेरुसागरजी महाराज, परमपूज्य गुरुदेवश्री समंतभद्र महाराज यांच्या शिष्यपरंपरेतील परमपूज्य मुनी १०८ श्री विजयभद्र महाराज, परमपूज्य १०८ श्री विद्याभूषणजी महाराज, श्रवणबेळगोळचे जगद्‌गुरु चारुकीर्ती भट्टारक

महास्वामीजी, नांदणी व कोल्हापूरचे भट्टारक यांचे मंगल सानिध्य व मार्गदर्शन लाभले.

विश्वशांतीसाठी पाच दिवस पाच महाविधानांचे आयोजन करण्यात आले. तसेच वेगवेगळ्या विषयावरती विचार संगोष्ठी आयोजित करण्यात आली. सन्मती या मासिकाच्या सुवर्ण महोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन घडले. तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख तसेच अन्य अनेक मान्यवर लोकांची उपस्थिती लाभली.

***५वा सुवर्णमहोत्सवी महामस्तकाभिषेक(२०१५)**

दि. ३० जानेवारी ते दि. ५ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत महामस्तकाभिषेक आयोजित करण्यात आला होता. यासाठी गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांच्या परंपरेतील शिष्य मुनिश्री १०८ विजयभद्र महाराज, त्यांचे शिष्य मुनिश्री १०८ श्रीभद्र महाराज, आचार्य श्री १०८ वर्धमानसागरजी महाराज संघासह उपस्थित होते. याप्रसंगी १२ मुनी, एक आर्यिका, २ क्षुल्लक, १४ माताजी आणि नांदणी व कोल्हापूरचे भट्टारक असा त्यागीगणांचा समूह होता. कर्मयोगी क्षुल्लक समर्पणसागरजी महाराज यांचे पावन निर्देशन लाभले. पाच दिवसात पाच महाविधानांचे आयोजन करण्यात आले होते.

तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस व अन्य अनेक विशिष्ट महानुभाव अतिथींची उपस्थिती लाभली.

*** ६व्या महामस्तकाभिषेकाची उद्घोषणा (२०२७)**

प्रत्येक बारा वर्षानंतर २८ फूट उंचीच्या भगवान बाहुबलीच्या बृहन्मूर्तीचा महामस्तकाभिषेक आयोजित करण्यात येत असतो. तो आता **शुक्रवार दि. ८ जानेवारी २०२७ ते बुधवार दि. १३ जानेवारी २०२७** या कालावधीत संपन्न होत आहे. या महामस्तकाभिषेकासाठी कुंभोज येथे चातुर्मासासाठी वास्तव्याला असणारे **आचार्य १०८ श्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांच्या मंगल सानिध्यात संपन्न होत आहे. नांदणीचे स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक महास्वामीजींचे मंगल निर्देशन लाभत आहे.** अशाप्रकारची उद्घोषणा रविवार दि. २६ जुलै २०२६ रोजी कुंभोज येथे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाशरावजी आवाडे अण्णा यांनी केली. सोबत संस्थेचे महामंत्री श्री. डी. सी. पाटील, विद्यापीठाचे कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब पाटील, आश्रमचे कोषाध्यक्ष डॉ. बाळासाहेब चोपडे, संचालक श्री. गोमटेश बेडगे, श्री. तात्यासाहेब अथणे, श्री. रवींद्र खोत, श्री. अशोक पाटील, नवनियुक्त सीईओ श्री. निशिकांत रायनाडे तसेच संस्थेचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते. या सर्वांनी आचार्यश्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांना श्रीफळ चढवून या महामस्तकाभिषेकास आपले मंगल सानिध्य लाभावे, अशी विनंती केली.

याप्रसंगी स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक महास्वामी यांनी प्रस्तावना करताना या अतिशय क्षेत्र बाहुबलीचा महिमा स्पष्ट करून परिसरातील सर्वच भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या या क्षेत्रावर अत्यंत भव्य व दिव्य अशाप्रकारे हा सोहळा संपन्न होईल, अशाप्रकारची आशा व्यक्त केली. चालू वर्षी आचार्य श्री चंद्रप्रभसागरजी महाराज यांचा पावन वर्षयोग कुंभोज येथे संपन्न होत आहे. त्यांनी मंगल आशीर्वाचन देत असताना म्हणाले की 'चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागर महाराज यांच्या शुभआज्ञेवरून गुरुदेव समंतभद्र महाराज यांनी या महामूर्तीची निर्मिती केली. या गुरुकुल संस्थेच्या मार्फत परिसरातील अज्ञान, अनिष्ट परंपरा दूर करण्याचे आणि जैनधर्म टिकून ठेवण्याचे महान कार्य घडले आहे. हा महामस्तकाभिषेक म्हणजे आमच्यासाठी एक अपूर्व सेवायोग आहे. आम्ही गुरुदेव श्री समंतभद्र महाराज यांचे सैनिक आहोत. वीराचार्य बाबासाहेब यांची बाहुबली ही कर्मभूमी आहे. गुरुदेवांच्या आज्ञेवरून त्यांनी व्यसनमुक्त समाज घडविण्याचा प्रयत्न केला आहे. निश्चितच या कुंभोज गावातील तरुण युवा वर्गांच्या पाठबळावर आम्ही हा महोत्सव अत्यंत भव्य व दिव्य असा संपन्न करू, अशी आम्हाला आशा आहे. निश्चितच चांगली धर्मप्रभावना घडेल, यात शंका नाही..'

मुखपृष्ठ परिचय....

# शोध : महाराष्ट्रातील पाले व लोहगडवाडी येथील आद्य जैन लेणींचा!

**सहाय्यक प्राध्यापक श्री. ओशिन बंब आणि समन्वयक डॉ. श्रीकांत गणवीर**
भगवान शीतलनाथ जैन पुरातत्त्व अध्यासन, प्रा. भा. इ. सं. व पुरातत्त्व विभाग,
डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था (अभिमत विद्यापीठ), पुणे
oshinbamb@gmail.com shrikant.ganvir@dcpune.ac.in

महाराष्ट्रातील जैन धर्माचा इतिहास हा पाचव्या-सहाव्या शतकापासून आहे, असा धाराशिव येथील जैन लेणीवरून मानला जात होता. पण नुकतेच नव्याने पाले व लोहगडवाडी येथे सापडलेल्या जैन लेणीवरून आता तो ६०० ते ७०० वर्षांपूर्वी म्हणजे इसवी सन पूर्व दुसऱ्या-पहिल्या शतकात पोहोचत आहे. अशाप्रकारचे संशोधनपूर्ण अभ्यास प्रस्तुत लेखात सादर केले आहे.

ओरिसा प्रांतातील केवळ उदयगिरी-खंडगिरी येथील शिलालेखात णमोकार मंत्र नाही तर महाराष्ट्रातील या दोन शिलालेखातही णमोकार महामंत्र दिसतो.

एखादा संशोधनात्मक लेख कसा असावा त्याचा आदर्श नमुना येथे दाखविला आहे. अत्यंत अल्पकाळात श्री. ओशिन बंब आणि डॉ. श्रीकांत गणवीर, पुणे यांनी हा लेख तयार करून दिला आहे. स्वास्थ्य ठीक नसतानाही त्यांनी हे परिश्रमपूर्वक कष्टसाध्य कार्य सहजतेने केले आहे. याबद्दल आम्ही सर्व संपादक सदस्य त्यांचे ऋणी आहोत. **प्रत्येक वाचकांनी हा लेख वाचल्याशिवाय पुढे जाऊ नये.**

पुरातत्त्वाच्या जगतात एक नवा शोध सुद्धा इतिहासाला कलाटणी देणारा ठरतो याची प्रचिती इ. स. १९६७-६८ च्या दरम्यान रामचंद्र भिडे या वारशा प्रेमींकडून महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यातील पाले या छोटेखानी गावी एका नैसर्गिक गुहा-कृत्रिम लेणी सदृश्य एका शैलगृहात असलेल्या एका ब्राह्मी लिपी व प्राकृत भाषेतील शिलालेखाच्या शोधातून आल्याशिवाय राहत नाही. प्रख्यात पुरातत्त्वज्ञ प्रा. डॉ. ह. धी. सांकलिया व सुप्रसिद्ध पुराभिलेखतज्ज्ञ डॉ. शोभना गोखले यांनी संयुक्तरित्या या शिलालेखांचा अभ्यास करून **पाले लेणीतील शिलालेखाचे वाचन प्रसिद्ध केले, आणि महाराष्ट्राच्या जैन धर्माच्या अज्ञात इतिहासावर केवळ नवा प्रकाश पडला असे नव्हे तर महाराष्ट्रातील जैन धर्माची प्राचीनता पुरातत्त्वीय दृष्ट्या पूर्णतः बदलून गेली.**

पुणे जिल्ह्यातील प्रारंभिक ऐतिहासिक कालखंडातील अनेक लेणी मोठ्या प्रमाणात कोरलेल्या आढळून येतात, त्यातील काही लेणी अजूनही अल्पज्ञात किंवा अज्ञात अशा आहेत. रामचंद्र भिडे यांनी पुणे जिल्ह्यात केलेल्या समन्वेषणात अज्ञात अशा काही लेणींचा नव्याने शोध लावला होता. पाले येथील एक लेणे अशाच एका शोध मोहिमेतून गवसलेले!

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात कामशेत पासून सुमारे १० कि. मी. अंतरावर, डोंगराच्या कुशीत वसलेले हे लेणे, बाह्यदर्शनी नैसर्गिक भासत असले तरी लेणीचा आतील भाग हा कोरीव आहे हे लेणीच्या आत कोरलेल्या दगडी बाक, शिलालेख, पायऱ्या, पाण्याचे कोरीव टाके व लेणीच्या शेवटी असलेल्या कोरीव खोलीच्या अस्तित्वावरून लक्षात येते. लेणीत प्रवेश करावयाच्या मार्गिकेच्या उजव्या बाजूला, कोरीव खोवणीच्यावर एका आयताकृती चौकटीत चार ओळींचा शिलालेख ब्राह्मी लिपीत व प्राकृत भाषेत कोरलेला आहे. या शिलालेखाचे वाचन खलील

प्रमाणे आहे:

**नमो अरहंतानं( । ) कातून( ं )**
**(द) भदंत इदरखितेन लेन ( ं )**
**कारापित ( ं ) पोढिच साह( । ) काहि**
**सह( । । )**

या शिलालेखाचा आशय, भदंत इदरखित (संस्कृत: इंद्ररक्षित), बहुतेक इतर काहि जणांसह लेणे व पाण्याचे कुंड कोरविले असा आहे. प्रा. ह. धी. सांकलिया व डॉ. शोभना गोखले यांच्या मते, या शिलालेखाच्या अक्षरवाटीकेच्या आधारे, प्रस्तुत शिलालेखाचा कालखंड साधारणतः इ. स. पू. दुसरे शतक (प्रारंभिक कालखंड) ते इ. स. पू. पहिले शतक (उत्तर कालखंड) असा निर्धारित केलेला आहे. डॉ. शोभना गोखले यांच्या मते या शिलालेखाचे साधर्म्य, बेडसा, भाजा, कोंढाणे येथील प्रारंभिक लेणीतील शिलालेखांशी दिसून येते.

पाले येथील शिलालेखाचा प्रारंभ 'नमो अरहंतानं' या जैन धर्माच्या मंगलाचरणाने होत असल्यामुळे **पाले लेणीतील शिलालेख हा जैन शिलालेख** असल्याचे प्रा. ह. धी. सांकलिया यांनी प्राचीन भारतातील प्राचीन धार्मिक शिलालेखांच्या आधारे, विशेषतः मथुरा येथील जैन शिलालेखांच्या आधारे सोदाहरणासह सिद्ध केले. पाले येथील जैन शिलालेखाच्या शोधामुळे महाराष्ट्रातील जैन धर्माच्या अस्तित्वाची प्राचीनता पूर्वी ठरवलेल्या कालखंडापेक्षा सुमारे सातशे वर्षे अधिक मागे गेली. या शिलालेखातून जैन धर्म प्रचारक भदंत इदरखित (इंद्ररक्षित) यांचे नाव सुद्धा ज्ञात झाले, जे जैन ग्रंथ परंपरेतून उपलब्ध होत नाही. इ. स. पू. दुसऱ्या–पहिल्या शतकात बौद्ध धर्मियांप्रमाणे जैन धर्मियांनी सुद्धा शैलगृहे कोरली होती असे दिसून येते. प्रा. ह. धी. सांकलिया यांनी पाले लेणी परिसरात अथवा ही लेणी असलेल्या पर्वत रांगेत आणखी जैन लेणी असल्याची शक्यता व्यक्त केली होती. इ. स. २०२०च्या प्रारंभिक महिन्यात वारसाप्रेमी व गिर्यारोहक विवेक काळे व त्यांच्या चमूने, लोहगड या मध्ययुगीन किल्ल्याच्या परिसरात केलेल्या सर्वेक्षणात, फारश्या ज्ञात नसलेल्या लेणी समूहातील, एका लेणीत नव्याने एका प्राचीन शिलालेखाचा शोध लागला. या शिलालेखाचे वाचन कलेतिहासतज्ज्ञ डॉ. श्रीकांत प्रधान, डॉ. अभिनव कुरकुटे आणि विवेक काळे यांनी केले असून 'एंशेंट एशिया' या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात लोहगडवाडी येथील लेणी समूह व शिलालेखावर संशोधन लेख प्रकाशित केला. लोहगड येथील या लेणीसमूहाचा उल्लेख बॉम्बे प्रेसिडेंसी गॅझेटिअर्सच्या मालिकेतील जेम्स कॅम्पबेल यांनी संपादित केलेल्या पुणे जिल्ह्याच्या दर्शनिकेत आढळून येतो. मात्र या शिलालेखाचा उल्लेख आढळून येत नाही. या लेणीसमूहाची धार्मिक संलग्नता निश्चितपणे प्रतिपादित केली नसली, तरी लोहगडावरील या लेणी समूह बौद्ध धर्माशी संबंधित असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली होती. डॉ. श्रीकांत प्रधान, डॉ. अभिनव कुरकुटे आणि विवेक काळे यांच्या संशोधनलेखात लोहगडवाडी येथील शिलालेखाचे प्रथमतः वाचन करण्यात आले. त्यांच्या वाचनानुसार, या शिलालेखाची सुरुवात 'नमो अरहंतानं' या जैन मंगलाचरणाने होत असल्यामुळे, पाले शिलालेखाप्रमाणे, या शिलालेखाचा जैन धर्माशी असलेला संबंध सिद्ध होतो.

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील यूनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून अधिघोषित झालेला लोहगड किल्ल्याचे मध्ययुगीन दुर्ग स्थापत्यात महत्त्वाचे स्थान आहे. नैसर्गिक भुदृश्याचा वारसा लाभलेल्या सह्याद्रि पर्वतरांगेत वसलेल्या या किल्ल्याच्या परिसरात, प्राचीन लेणींचे अवशेष दृष्टिगत होतात. लोहगड व लोहगडवाडी परिसरातील प्राचीन लेणींचे विस्तृत पुरातत्त्वीय अध्ययन झालेले दिसून येत नाही. . श्रीकांत प्रधान, डॉ. अभिनव कुरकुटे आणि विवेक काळे यांच्या संशोधन लेखात, लोहगडच्या प्रवेश मार्गाच्या

उत्तरेकडील, लोहगडवाडी परिसरात स्थित सात लेणीयुक्त एका समूहाचे विस्तृत अध्ययन, त्यांच्या तळविण्यासासहित सर्वप्रथम प्रकाशित झालेले आहे. याच लेणी समूहातील लेणे क्रमांक ७, जे सध्या पाण्याचे कुंड म्हणून वापरात आहे, त्या लेणीच्या प्रवेशाच्या डाव्या बाजूला सहा ओळींचा ब्राह्मी लिपीतील व प्राकृत भाषेतील शिलालेख कोरलेला आहे. या शिलालेखाचे उपरोक्त निर्देशित संशोधकांनी खालीलप्रमाणे वाचन केलेले आहे.–

**नमो अरहंतानं भयं**

**त इदरखितेन पोढि**

**(पे?) (थे) (का?) पथो दोआसना**

**(नि) वेयिका च कारापिता**

**(स) (ह) केहि सह ( ा ) गोसाले**

**..................(नि)कतोन(ं)**

प्रस्तुत शिलालेखाचा आशय, भयंत इदरखित (संस्कृत : इंद्ररक्षित) यांनी गोसाल याच्या सहित, पथ (मार्ग), दोन आसन, पाण्याचे टाके आणि वेयिका (वेदिका) निर्माण केल्या आहेत, असा आहे. प्रस्तुत शिलालेखाची सुरुवात, पाले शिलालेखाप्रमाणे जैन धर्मियांशी संबंधित 'नमो अरहंतानं' या मंगलाचरणाने झालेली असून, या शिलालेखात सुद्धा पाले शिलालेखात उल्लेखित भदंत इदरखित (संस्कृत : इंद्ररक्षित) यांचा उल्लेख केलेला आहे.

लोहगडवाडी लेणी समूहातील, लेणे क्रमांक १ हे आकाराने सर्वात भव्य असून दोन लेणे हे एका द्वाराने जोडलेले आहेत. समोर व्हरांडा, त्यामागे चौरस किंवा आयताकृती मंडप व डाव्या बाजूकडील मंडपाच्या मागे एक खोली असे साधारणतः या लेणीचे स्वरूप आहे. उजव्या बाजूकडील मंडप आकाराने लहान असून त्याच्या डाव्या बाजूस दोन आसने कोरलेली आहेत. या लेणीलगत एक आयताकृती कोरीव लेणी सादृश्य रचना असून सध्या त्याचा वापर पाण्याच्या टाक्यासाठी होत असला तरी प्रारंभिक काळी ही सुद्धा कोरीव खोली सादृश्य रचना असावी. लेणे क्रमांक ४ हे अन्य महत्त्वाचे लेणे असून समोर आयताकृती व्हरांडा, ज्यात मागील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस कोरीव आसने, दोन कोरीव खोल्या युक्त चौरस मंडप, असे या लेणीचे स्वरूप आहे. लेणी क्रमांक ६ हे सध्या पाण्याचे टाके म्हणून वापरात असलेले कोरीव लेणे सादृश्य रचना असून त्यात दोन स्तंभ दिसून येतात.

लोहगडवाडी लेणे क्रमांक ७ येथील प्रस्तुत शिलालेखाच्या अक्षरवाटीकेच्या अध्ययनावरून या शिलालेखातील अक्षराचे नाणेघाट येथील सातवाहन साम्राज्ञी नागणिकेच्या शिलालेखातील अक्षराशी असलेले विलक्षण साधर्म्य बघता डॉ. प्रधान व संशोधकांनी लोहगडवाडी लेणे क्रमांक ७ येथील शिलालेखाचा संबंधित कालखंड साधारणतः इ. स. पू. पहिले शतक असा ठरविला आहे.

**पाले आणि लोहगडवाडी शिलालेखात जैन कोरीव शैलस्थापत्याशी संबंधित** काही महत्त्वपूर्ण शब्दांचा उल्लेख प्राप्त होतो, ज्यात लेन, पथ, आसन, वेयिका व पोढि यांचा प्रामुख्याने समावेश होतो. जैन संस्कृतीशी निगडीत धार्मिक स्थापत्य समजावून घेण्यासाठी उपरोक्त निर्देशित दोन्ही शिलालेखात उल्लेखित शब्द महत्त्वाचे आहेत.

महाराष्ट्रातील प्रारंभिक बौद्ध लेण्यातील प्राकृत शिलालेखात कोरीव शैलगृहांसाठी (प्रामुख्याने निवासस्थांनासाठी कोरलेल्या) लेण आणि लयन हे शब्दप्रयोग प्रयोजनात आलेले आहेत. पथ (जोडणारा मार्ग), पोढि (पाण्याचे टाके), आसन (कोरीव बाक) हे शब्दप्रयोग प्रारंभिक जैन मठांशी संबंधित धार्मिक समुदायाच्या (मुनिसंघाच्या) स्थापत्यावर प्रकाश टाकतात. वेयिका हा शब्द प्रयोग वेदिका या शब्दाशी अभ्यासक सामान्यतः संबंध प्रस्थापित करीत असले, तरी प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ म. न. देशपांडे यांच्या मते वेयिका हा शब्द संस्कृत 'वृत्तिका' या शब्दाशी जास्त निगडीत असून, वृत्तिकाचा अर्थ साधारणतः

कुंपण असा होतो. लोहगडवाडी शिलालेखाच्या संदर्भात वेयिका शब्दाचा अर्थ लाकडी कुंपण असा होत असावा, ज्याचा वापर लेणे क्रमांक १, ४, इत्यादीच्या आतील भिंतीत केला गेला असावा. लोहगडवाडी लेणी समूहातील लेणी क्रमांक १, ४, इत्यादींच्या भिंतीला असलेल्या खोबण्याच्या रांगेवरून साधारणतः असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो.

**पाले आणि नव्याने शोध लागलेल्या लोहगडवाडीच्या जैन शिलालेखावरून महाराष्ट्रातील जैन धर्माच्या इतिहासावर नवा प्रकाश पडलेला आहे.** वाङ्मयीन पुराव्यासोबतच अभिलेखीय पुराव्याचे अनन्यसाधारण महत्त्व या शिलालेखांमुळे अधोरेखित झालेले आहे. वाङ्मयीन परंपरेत भदंत इदरखित यांच्या नावाचा उल्लेख आढळून येत नसला तरी पुरातत्त्वीय, विशेषतः अभिलेखीय पुराव्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात जैन धर्माच्या प्रारंभिक प्रचाराचे श्रेय भदंत इदरखित (मुनी इंद्ररक्षित) या जैन धर्म प्रचारकांना जाते, हे नव्यानेच माहीत होऊ शकले. इ. स. पू. दुसऱ्या-पहिल्या शतकात, जेव्हा पश्चिम महाराष्ट्रात प्रारंभिक बौद्ध धर्माचा प्रचार बहरला असताना, जैन धर्मिय लेणी व शिलालेख, जैन धर्माचे महत्त्वपूर्ण अस्तित्व सिद्ध करतात.

तामिळनाडू व कलिंग (उदयगिरी-खंडगिरी) येथील प्रारंभिक जैन शिलालेख प्रामुख्याने राजाश्रय किंवा व्यापारी वर्गाच्या दानांचा उल्लेख करतात. पाले व लोहगडवाडी जैन शिलालेख भदंत इंद्ररक्षित व गोसाल यांच्या दानकार्याचा म्हणजेच धर्मगुरूंच्या (मुनींच्या) दानांचा उल्लेख करतात. अर्थात मुनी स्वतः पैसे साठवत नसल्यामुळे, मुनींनी हे दान देण्यास कोणालातरी प्रतिपादित केले असावे, असा अर्थ आपल्याला इथे समजता येईल.

**पाले येथील शिलालेखयुक्त जैन लेण्याच्या शोधाआधी, पुरातत्त्वीय पुराव्याच्या आधारे, महाराष्ट्रात, साधारणतः इ. स. ५व्या-६व्या शतकात जैन धर्माचे अस्तित्व धाराशीव जैन लेणी समूहाच्या आधारे अभ्यासक सिद्ध करीत असत. मात्र पाले आणि नव्याने शोध लागलेल्या लोहगडवाडी येथील जैन लेणी व जैन शिलालेखाच्या आधारे महाराष्ट्रातील जैन धर्माच्या अस्तित्वाची प्राचीनता, सुमारे सहाशे-सातशे वर्षेआधी, म्हणजेच, इ. स. पू. दुसरे-पहिले शतक इतकी मागे नेता आली आहे.**

जैन धार्मिक परंपरेनुसार दक्षिण भारतात जैन धर्माच्या प्रसाराचे श्रेय मौर्य सम्राट चंद्रगुप्त यांच्या समकालीन असलेल्या आचार्य भद्रबाहू यांना जाते, ज्यांचा कालखंड साधारणतः इ. स. पू. चौथ्या-तिसऱ्या शतकादरम्यान मानला जातो. आचार्य भद्रबाहू व त्यांच्या शिष्यांद्वारा दक्षिण भारतात, प्रामुख्याने कर्नाटकात जैन धर्माचा प्रचार केला गेला असला तरी, त्यांच्या काळात तामिळनाडू, महाराष्ट्र आदि प्रदेशात जैन धर्म प्रविष्ट झाला असण्याची दाट शक्यता आहे. तामिळनाडूमधील असंख्य प्राचीन जैन शिलालेख याला निश्चितच दुजोरा देतात. महाराष्ट्रातील पाले-लोहगडवाडी येथील प्राचीन जैन शिलालेख सुद्धा, महाराष्ट्रातील जैन धर्माची प्राचिनता इ. स. पू. दुसऱ्या-पहिल्या शतकापर्यंत निश्चित मागे घेऊन जातात.

मान्यता आणि इतिहास यांचा आपआपल्या परीने महत्त्व आहेच, परंतु पुरातत्त्वीय पुरावे अनेकवेळा नवनवीन माहिती समोर आणतात. उपरोक्त दोन्ही लेणी दिसायला भव्य नाहीत, परंतु त्यांचे व्यापारी मार्गांसोबत असलेले संबंध त्यांच्या स्थान निर्देशावरून लक्षात येते. या लेणी प्रामुख्याने मुनिनिवासाकरिता कोरलेल्या असल्याने आत कुठेच मूर्ती दिसून येत नाहीत. नमोकर मंत्र हे प्राचीन आहे असे आपण मानतोच, परंतु मथुरा, उदयगिरी-खंडगिरी, पाले व लोहगडवाडी येथील शिलालेखांमुळे याची प्राचीनता पुरातत्त्वीय दृष्ट्यादेखील सिद्ध होते. प्राचीन ग्रंथांतून जैन धर्माविषयी माहिती मिळतेच, परंतु प्राचीन काळात जैन धर्म प्रस्थापित करण्याचे कार्य केलेल्या अनेक

मुनींचे उल्लेख शिलालेखिय पुराव्यांवरून माहीत होतात, जे कदाचित इतरत्र कुठे माहीत होत नाही. पुरातत्त्वीय दृष्ट्या महत्त्वाच्या या दोन्ही लेणी सामान्य माणसांच्या तेवढ्याशा परिचित झाल्याचे दिसून येत नाही. या लेणींच्या उदाहरणावरून अशा अनेक पुरातत्त्वीय महत्त्वाच्या जैन स्थळांचे संवर्धन, शास्त्रशुद्ध अभ्यास आणि जतन यांची गरज नक्कीच अधोरेखित होते आणि सोबतच जैन धर्माच्या अभ्यासाकरिता लिखित पुराव्यांसह पुरातत्त्वीय अभ्यासाची जोड देणे किती महत्त्वपूर्ण आहे हे सुद्धा लक्षात येते.

**संदर्भ:**


Ganvir, Shrikant, and Oshin Bamb. 2026. “Bhadata Idarakhita and Early Jainism in the Western Deccan: An Archaeological Pers{ective.” In Investigating Jainism: Visual Art, Text and History, edited by Shrikant Ganvir, 257-282). New Delhi and Pune: Kaveri Books and Deccan College Post-Graduate and Research Institute (Deemed to be University).

Pradhan, Shrikant, Abhinav Kurkute, and Vivek Kale. 2020. “Recently Noticed Inscrpition from Lohagadwadi (Fort Lohagad), District Pune, Maharashtra, India.” Ancient Asia 11: 1-7.DOI: http://doi.org/10.5334/aa.187


Sankalia, H. D. 1975. “Early Epigraphical Evidence of the Prevalence of Jainism in Gujarat (Saurashtra), Western Maharashtra and Andhra Pradesh.” Prachya Pratibha 3 (1): 1-9.

Sankalia, H. D., and Shobhana Gokhale. 1971. “A Brāhmī Inscrpition from Pale.” Epigraphia Indica 38 (4): 167-68.

Shah, Viraj. 2008. Jaina Rock-Cut Caves in Western India with Special Reference to Maharashtra. 2 vols. New Delhi: Agam Kala Prakashan.





पाले येथील जैन लेणी



पाले येथील ब्राह्मी लिपी आणि प्राकृत भाषेतील शिलालेख



लोहगडवाडी येथील लेणी क्रमांक ७ (साभार: डॉ. श्रीकांत प्रधान)



लोहगडवाडी लेणीवरील जैन शिलालेख (साभार: डॉ. श्रीकांत प्रधान)

# योगसार चिंतन

(पुष्प १५)

– **प्रियदर्शन जैन**

**वयतवसंजमुसलु जिय, ए सव्वे अकइच्छु।**
**जाव ण जाणइ इक्क, परू सुद्धउ भाउ पवित्तु।।३१।।**

**पुण्णिं पावइ सग्ग जिउ, पावइ णरयणिवासु।**
**वे छंडिवि अप्पा मुणइ, तउ लब्भइ सिववासु।।३२।।**

**अर्थ–** जोपर्यन्त आपल्या निर्मल आत्मतत्त्वाचा अनुभव या जीवाला (आपल्याला) होत नाही, तोपर्यंत व्रत–तप–संयम हे सारे निष्फल होत.।३१।

**अर्थ–** या जीवास पुण्याने स्वर्गप्राप्ती होते तर पापाने हा जीव नरकात जातो, आणि पुण्य–पाप या दोन्ही मधील ममतेचा त्याग करून जो जीव आपल्या निज आत्म्याचे मनन करून त्यातच रमतो, तो शिवमहाली (मोक्ष) प्रवेश करतो.।।३२ ।।

ही गाथा तिसाव्या गाथेला पूरक आहे. आचार्य देव सांगतात–'हे जीवा! जोपर्यंत तू आपल्या शुद्ध आत्म्याचा अनुभव घेत नाहीस, म्हणजेच सम्यग्दर्शन प्राप्त करत नाहीस, तोपर्यंत सर्व बाह्य क्रियाकलाप निरर्थक आहेत; हे तू जाणून घे. 'शुभ–अशुभ परिणामांपासून निवृत्ती आणि आपल्या आत्मदेवाकडे दृष्टी हेच वास्तविक चारित्र आहे, हे सत्य जाण! त्यावर श्रद्धा कर, मगच सर्व क्रिया सार्थकी लागतात आणि भूमिकेनुसार अशुभातून निवृत्ती आणि शुभाकडे प्रवृत्ती हे व्यवहार चारित्र प्रगट होते; परंतु सम्यग्दृष्टी जीवाला त्यामध्ये कर्तृत्व बुद्धी नसते. तो हे सत्य जाणतो की, निश्चय चारित्र हेच संवर–निर्जरेस कारण आहे, मोक्षाला कारण आहे.'

आचार्यदेव सांगू इच्छितात की– 'हे आत्मन्! आत्मानुभव अर्थात् सम्यग्दर्शनाची प्राप्ती तू कोणत्याही अवस्थेत करू शकतोस, मग ती मनुष्य पर्याय असो की तिर्यंच पर्याय असो..देव पर्याय असो की नारकी पर्याय असो..... आत्म्याचे शुद्ध स्वरूप जाणण्याचा आणि त्याची प्रतीती करण्याचा मार्ग जीवाच्या अंतरंग योग्यतेवर आणि पुरुषार्थावर अवलंबून असतो.... ना की बाह्य परिस्थितीवर किंवा संयोगांवर..यासंबंधी कितीतरी उदाहरणे आपल्या आगमात सांगितली आहेत.'

आचार्यदेव या गाथेत सांगतात– 'हे भव्य जीवा! जोपर्यंत तू वीतराग स्वरूपी आत्म्याच्या शाश्वत– शुद्ध–ध्रुव स्वभावाला जाणणार नाहीस, तोपर्यंत तुला द्रव्यदृष्टी लाभणार नाही. आणि जोपर्यंत द्रव्यदृष्टी लाभणार नाही, तोपर्यंत आत्मानुभूती होणार नाही.. आणि आत्मानुभूती शिवाय केलेले सर्व व्रत–तपादी व्यवहार व्यर्थ आहेत. आत्मदेवाच्या अनुभूतीच्या साक्षीने केलेले शुभभाव आणि शुभक्रिया याच शुभोपयोग या संज्ञेस पात्र ठरतात. म्हणूनच आपल्या आत्मभावनेस जप.. फक्त बाह्य त्यागावर भर देवून आपल्या आत्मपरिणतीस विसरू नकोस.. तिला प्रत्येक वेळेस आपल्या सोबत ठेव..!

या ग्रंथात आचार्यदेव वारंवार सम्यग्दर्शनावर भर देत आहेत; कारण सम्यग्दृष्टी जीवास वस्तुस्वरूपाचे यथार्थ श्रद्धान असते..शुभ आणि अशुभ परिणामांपासून निवृत्ती आणि भगवान आत्म्याची दृष्टी हेच शुद्धोपयोगाचे मूळ कारण आहे, या सत्याची जाणीव होते आणि जसजशी शुद्धोपयोगात रमणता वाढत जाते तसतसे चारित्र

कलेकलेने वाढत जाऊन पूर्णत्वास प्राप्त होऊन हा जीव सिद्धशिलेवर विराजमान होतो.

याचा अर्थ असा काढू नये की, शुभोपयोगाच्या त्यागाने शुद्ध उपयोगाची प्राप्ती होते..तो तर भूमिकेनुसार परिणामांच्या निर्मळतेने स्वतःहून होतो. सम्यग्दृष्टी जीव शुभोपयोगात असताना सुद्धा शुद्ध उपयोगाच्या भावनेने सतत ओथंबलेला असतो..चारित्रमोहाच्या उदयामुळे हा जीव सुद्धा शुभ-अशुभ कर्म करीत असताना दिसतो; परंतु त्यावेळी सुद्धा त्याचे प्रयत्न दोहोंचाही त्याग कसा होईल याचेच असतात. परंतु शुद्ध उपयोगात स्थिर न राहू शकल्यामुळे त्याला शुभोपयोग होतो..तो करीत नाही.

हे सारे उमजण्याकरिता वस्तुस्वरूपाचे यथार्थ ज्ञान असणे आवश्यक आहे. याकरिता सम्यक् स्वाध्यायाची नितांत आवश्यकता आहे.. म्हणूनच स्वाध्यायाला परम तपाची उपमा दिलेली आहे..

जीव शुभ परिणामांनी (दान-दया-शील-संयम आदि) स्वर्ग सुखाला प्राप्त होतो. श्रावक तथा मुनींचे व्यवहार चारित्र, क्षमाभाव, अल्प आरंभ, अल्प ममत्व, कोमलता, मन-वचन-कायेद्वारा कपट रहित आचरण, परगुण प्रशंसा, आत्मगर्हा, निरभिमानता आदि सारी स्वर्गाची कारणे आहेत.

अशुभ भाव केल्याने असाता वेदनीय, अशुभ आयु, अशुभ नाम, अशुभ गोत्र इ.पाप कर्म जीवाला बंधनात अडकवितात. ज्ञान साधनेत विघ्न केल्याने, दुसऱ्याला दुःख दिल्याने, तीव्र कषाय केल्याने, अन्याय, अनीती, अभक्ष्य भक्षण, बहु आरंभ-परिग्रह, हिंसा, अभिमान, असत्य वचन आदि पाच पापरूपी प्रवर्तन केल्याने जीवास नरक गतीचा बंध होतो.

पुण्य-पाप, शुभाशुभ भाव हे बंधाला कारण असल्यामुळे जीवाचे संसारात सदोदित भ्रमण सुरूच राहते. यांचे खरे स्वरूप समजून जो जीव निरपेक्ष होतो आणि आपल्या आत्मप्रभूचे सन्मुख होऊन त्याचा आश्रय घेतो, तो निश्चितच मोक्षाला प्राप्त करतो.

जिथे या तथ्याचा स्वीकार होतो, तिथे नियमाने यथोचित व्यवहार सुद्धा असतोच.. परंतु एक गोष्ट सतत ध्यानात ठेवली पाहिजे- अबंध रूप आत्म्याचे ध्यानच मोक्षाचे कारण आहे, अन्य कुणी नाही. आत्मस्थित होणारा ज्ञानी जीव आपोआपच आपल्या स्वभावात जगू लागतो.. कारण त्याच्या वृत्तीत म्हणजेच श्रद्धानामध्ये काही करण्याची भावना नसते आणि प्रवृत्तीमध्ये सुद्धा तो हळू-हळू ज्ञातारूपाने स्थिर होत जातो.

सर्वसामान्य जीवाच्या मनात कधी कधी प्रश्न येतात..जर पुण्य- पाप दोन्ही पासून दूर राहायचं तर मग करायचे काय? पूज्य गणेशप्रसादजी वर्णीजी आपल्या एका पत्रात सांगतात की, 'आपल्या वर्तमान परिणामांच्या निर्मळतेवर दृष्टी ठेवा. कारण सम्यग्दृष्टी-सम्यग्ज्ञानी जीवाच्या वाट्यास जे औदयिक भोग असतात, त्यामध्ये त्याची वियोग बुद्धी असते ....आणि येणाऱ्या भोगांची अभिलाषा नसते..आणि भूतकाळात केलेल्या भोगांचे प्रतिक्रमण असते. अशी सावधानता ज्या जीवाचे ठायी असेल त्याला कसलीच भीती नसते..जेव्हा आपले परिणाम वर्तमानकाळात निर्मळ असतात, तेव्हा उत्तरकाळात मिळणारे त्यांचे फळही उत्तमच असणार.. म्हणूनच आपले परिणाम निरंतर निर्मळ ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'

किती सुंदर रीत्या समजाऊन सांगतात ते! ते पुढे म्हणतात.- 'भूमिकेनुसारच शान्तीचा आस्वाद येणार.. जितकी-जितकी कषायांची कृशता वाढत जाईल तितकी-तितकी निर्मळता वाढत जाईल.... अत: चिंता करू नका.. सानंद सर्व पदार्थांपासून ममत्व सोडण्याचा यत्न करा.. आपल्या आत्म्याचा परिग्रह आत्माच आहे.. त्याचेच निरंतर स्मरण करा.. बुद्धिमान मनुष्य पराला आपलं मानत नाही. तुमचे जे भाव होतात ते सुद्धा औदयिकच असतात.. त्यांना आपल्या आत्म्याचे मानू नका, अनात्मीय

जाणा... त्यांना जाणताना जो ज्ञायक भाव तोच आपला आहे....फक्त त्यास आत्मीय जाणा.. त्यातच संतोष करा.. त्यानेच तृप्ती होईल.'

शेवटी हेच समजायचे आहे की, पुण्य आणि पापाचे फळ म्हणजेच हा संसार.. यातून मुक्त होण्याचा एकमेव उपाय म्हणजे पुण्य-पापरूपी भावांपासून सर्वथा भिन्न अशा आपल्या आत्मतत्त्वाची खरी ओळख करून घेणे.. आणि हेच आपले प्रथम कर्तव्य असले पाहिजे! त्याचा स्वीकार जे जीव करतात, त्यातच सतत रममाण होण्याचा पुरुषार्थ करतात; तेच सिद्धदशेला प्राप्त होतात. म्हणूनच एकमात्र आत्मानुभवच दु:खनाशक आणि सुखदायक क्रिया आहे.....संपूर्ण जिनवाणीचा हाच सार आहे.

*****

( क्रमशः )

---

## बाहुबली विद्यापीठाचे ५वी व ८वी शिष्यवृत्ती या परीक्षेतील सुयश

*** जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर व आक्काताई नरसाप्पा नांद्रेकर ज्युनिअर कॉलेज, जयसिंगपूर**

* इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा-

१) कु. शांभवी देसाई हिने २७२ गुणांसह **राज्यात १५वा** व जिल्ह्यात २३ वा क्रमांक मिळवला.

२) चि. शौर्य कळसापनावर - २६८ गुण, जिल्ह्यात ४० वा

३) श्रवण पाटील - २६६ गुण, जिल्ह्यात ४९ वा,

४) सानवी चौगुले - २६० गुण, जिल्ह्यात ७३ वी,

५) राजवीर मगदूम - २५८ गुण, जिल्ह्यात ८७ वा,

६) सुमित नेज - २४८ गुण, जिल्ह्यात १८०वा

७) पुष्कर तकडे - २४६ गुण, जिल्ह्यात १९७वा,

८) समर्थ काळकुट्टे - २४६ गुण, जिल्ह्यात १९८वा

* इ. ८वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी -

१) तनिष खामकर - २८० गुण, राज्यात ९वा, जिल्ह्यात ८वा

२) स्वयम किणीकर - २५२ गुण, जिल्ह्यात ७४ वा

३) स्वरूप नकाते - २४४ गुण, जिल्ह्यात १३५ वा

४) संस्कार एडवान - २४२ गुण, जिल्ह्यात १४१ वा

५) ध्रुव बेडक्याळे - २४२ गुण, जिल्ह्यात १४६ वा

६)अथर्व समराई - २४० गुण, जिल्ह्यात १५९ वा

७) सायली बाळीकाई - २३८ गुण जिल्ह्यात १६६ वी

*** एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली**

* इ. ८वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी -

१) सिद्धी गबरू खोंद्रे, गुण २३४ तालुक्यात ११वा क्रमांक

* इ. ५वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी -

१) विराज भरत नकाते, ५वी गुण २५६, तालुक्यात १५वा क्रमांक

*** विद्यासागर हायस्कूल, अकिवाट**

* इ. ५वी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी -

१) आर्यन अवधूत होनमाने, **राज्यात ११वा क्रमांक**

२) आरव अमित कोरे, जिल्ह्यात ९१वा क्रमांक

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १५)

**हर्षा वेखंडे, नागपूर,**९८२२६९०८६०

**✻ आवश्यकापरिहाणी भावना (भाग १)**

स्वाध्याय कक्षातील त्या छोट्याशा बैठकीत मांडी घालून बसलेल्या आजी.. त्यांच्या समोरील चौकीवर विराजमान शास्त्र आणि त्यासमोर अर्धगोलाकार बसलेली घरातील छोटी मंडळी..

कामं आटोपत असणाऱ्या चेतनाचं लक्ष घरातील या सर्वात सुंदर आणि मंगलमय दृश्याकडे सतत वेधलं जात होतं. भराभर पसारा आवरून तिने स्वाध्याय कक्षात पाऊल टाकलं आणि प्रसन्नतेचा प्रवाह जणू तिच्याकडे धावत आला! उत्फुल्ल अंतःकरणाने तिने आसन घेतलं...

आजींनी तिच्याकडे नजर टाकली आणि सुरुवात केली..

‘तर मुलांनो, आज कुठल्या भावनेचा दिवस?’ आजीने प्रश्न उचलला.

‘आजी, आज आपल्याला आवश्यकापरिहाणी भावना समजून घ्यायची आहे.’ संवेग म्हणाला

‘आवश्यकापरिहाणी ही सोलह कारण भावनांमधील चौदावी भावना आहे.’ सक्षमने माहिती पुरवली.

‘पण आजी, या शब्दांमधून आम्हाला काहीच कळलं नाही..’

‘संवेग ! ‘आवश्यक’ कोणाला म्हणतो आपण... जे अवश्य केलंच पाहिजे ते आवश्यक. कुठल्या कुठल्या गोष्टी आवश्यक वाटतात आपल्याला?’

‘आजी, आंघोळ-जेवण-अभ्यास..’ तत्परतेने सक्षम म्हणाला..

सारे हसले ...

‘अगदी बरोबर! शरीराच्या शुद्धीसाठी आंघोळ.. आणि शरीराच्या पोषणासाठी जेवण.. पण सक्षम, आपण नेमकं कोण? आत्मा की शरीर..?’

सक्षम वरमला, म्हणाला ‘आजी, आपण आत्मा..!’

‘अगदी बरोबर. मग त्या आत्म्यासाठी, आत्मशुद्धीसाठी काही गोष्टी करायच्याच असतात, त्यांना म्हणतात ‘आवश्यक’. म्हणजे अवश्य करण्यायोग्य आणि ‘परिहाणि’ या शब्दाचा अर्थ होतो हानी होणे किंवा घट होणे, कमी पडणे. अर्थात् ‘अपरिहाणि’ म्हणजे अशी हानी न होणे.

आवश्यकापरिहाणि या भावनेचा भावार्थ आहे- ‘माझी भावना सतत अशी असावी की, ज्या आवश्यक क्रिया आहेत त्यांच्याकडे माझ्याकडून दुर्लक्ष न होता सतत अधिकाधिक दृढतेने त्या माझ्याकडून घडाव्यात.... त्या मी कधी विसरू नये, त्यांची घट होऊ नये... या आवश्यक क्रियांबाबत मी सतत जागरूक आणि नियमित राहावं. ही भावना जीवाला मोक्षमार्गावर स्थिर ठेवते. या भावनेचं उत्कृष्ट फळ म्हणजे तीर्थंकर नामकर्माचा बंध होतो, एवढी श्रेष्ठ ही भावना आहे!’

मुलं कान टवकारून बसले होते.

‘मुलांनो, अजून दुसरा अर्थ सांगते. ‘अवश्य’ म्हणतात मुनींना. मुनीचर्या म्हणजे मोक्षमार्गासाठी आवश्यक क्रियांचा समूह. ज्या करण्यासारख्या क्रिया आहेत तेवढेच ते करतात. संसार वाढवणाऱ्या क्रिया करत नाहीत म्हणून मुनींनाच ‘अवश्य’ म्हटलं जातं आणि त्यांच्या आवश्यक क्रिया आहेत सामायिक, स्तवन, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान आणि कायोत्सर्ग.

‘म्हणजे आजी, आवश्यकापरिहाणी ही

भावना मुनींसाठी आहे तर... आमच्यासाठी नाही!' संवेग म्हणाला.

'नाही हं.. अजिबात असं नाही! संसारी जीवाला मग तो सामान्य गृहस्थ असो वा मुनिराज... आवश्यक आहे मोक्षमार्गाकडे वळणं आणि तिथे स्थिर होणं. मग त्यासाठी आवश्यक बाबी करणार कोण? सारे मुनिराज त्यांच्या भूमिकांनुसार आवश्यकांचे पालन करणार आणि आपल्यासारखे श्रावक आपल्या भूमिकेनुसार आवश्यकांचे पालन करणार. आपल्याला काही विशेष सूट नाही बरं का! ही भावना आपल्याला संसाराच्या चिखलातून वर उचलून तीर्थंकर नामकर्मरूप पुण्याचा बंध करवते. त्यामुळे हे परिणाम उत्कृष्ट शुभ परिणाम आहेत. आपल्याला सांगितलेल्या षट्आवश्यकांचे आपण नियमाने पालन करावे.
माहिती आहेत ना, संवेग, सहा आवश्यके ?

**देवपूजा गुरूपास्तिः स्वाध्यायः संयमस्तपः।**
**दानं चेति गृहस्थानां षट्कर्माणि दिने दिने।।**

हे आहेत बरं का श्रावकांचे षट् आवश्यक..! देवपूजा, गुरूंची उपासना, स्वाध्याय, संयम, तप आणि दान.'

'आजी! आपल्या घरी रोज देवपूजा होते आणि आपण महाराजांच्या दर्शनाला पण जातो रोजचा स्वाध्याय करतोच... मग आपण पण बनणार का तीर्थंकर....' सक्षमने प्रश्न विचारला.

आजींच्या चेहऱ्यावर स्मित हास्य उमटलं. त्या म्हणाल्या 'देवपूजा- गुरूंची उपासना- स्वाध्याय.. करावं.. अवश्य करावं...! धर्माकडे वळण्यासाठी हे निमित्त आहेत. पण देवपूजा म्हणजे फक्त अष्टक देणं, जयमाला, आरती, छोटी पूजा, मोठी पूजा एवढंच नव्हे! तर देवपूजा करता करता देवही कधीकाळी आमच्यासारखेच होते, त्यांनी काय केलं, कुठला मार्ग निवडला, हे ध्यानी यावं, आमची पावलं त्या दिशेने वळावीत... तर ती देवपूजा सार्थकी लागली असं म्हणता येईल.

गुरूंच्या निकट बसून आत्मकल्याणाचा रस्ता समजून घेतला तर गुरूंची उपासना कार्यकारी,... अन्यथा नाही... गुरूंचं अनुसरण करण्याची भावना इतकी प्रबळ व्हावी की कधी हळूहळू संसाराच्या मोहाचे पाश ढिले झाले हे लक्षातही न यावे.. तर ती खरी गुरूंची उपासना !

स्वाध्याय म्हणजे ग्रंथाची चार पानं उलटणं नव्हे, तर एक एक शब्द कोरला जावा हृदयावर.. त्याचा अर्थ असा उमटावा की, अंतरंगात आत्मप्रभू प्रगट व्हावा.. तर तो खरा स्वाध्याय! स्वाध्याय म्हणजेच स्वतःचा अध्याय उघडणं... शास्त्रांमध्ये लिहिलेले तथ्य व्यवस्थित समजून त्यांना आपल्या जीवनात प्रगट करणे म्हणजे स्वाध्याय!! तसेच संयम, तप आणि दान...

कठीण वाटतं ना हे सारं.. पण बघा आपलं जेवण रात्रीच्या आत आटोपलं.. आता खाण्याचे कुठले विकल्प नाहीत.... बस तुमचा थोडासा अभ्यास आणि मग झोपायला जायचं... सगळं कसं शांत आणि निवांत.. एक छोटासा नियम किती साऱ्या आकुलतेला विराम देणारा राहिला! संयमाचे फळ शांती आहे..

तप आत्मशुद्धीचं कारण आहे.....छोटे छोटे नियम घेतले जाऊ शकतात.. आणि निष्कारण होणाऱ्या आकुलतेपासून वाचलं जाऊ शकतं.

दान चार प्रकारचे. आहार दान, औषधी दान, अभय दान आणि ज्ञानदान. हे इतरांच्या कल्याणासोबत स्वकल्याणाचं कारण बनतात. आपल्या आजूबाजूच्या लोकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार विवेकपूर्ण दानाचे परिणाम तर असावेतच, पण साधर्मी जीवांच्या प्रति मदतीचे भाव सतत असावेत.

या सगळ्या आवश्यक क्रियांमध्ये आपलं लक्ष वेधून राहिलं तर, अनावश्यक कामांसाठी आपल्याजवळ वेळच राहणार नाही! खरं सांगू?... मोक्षमार्गात लागून राहणं हेच आवश्यक आहे आणि हेच करण्यासारखं कर्तव्य आहे...!!

गृहस्थअवस्थेतही आपण स्वतःला तीर्थंकर

पदापर्यंतच्या उच्च स्थानावर नेऊन ठेवण्याची व्यवस्था करून ठेवू शकतो.

ज्यांच्या जीवनात हे षट्आवश्यक सहजतेने दिसतात, त्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करावा आणि आपणही हे आवश्यक कर्तव्य करण्याची भावना सतत मनात ठेवावी. काय सक्षम, आलं का लक्षात?' आजी हसत म्हणाल्या.

'हो आजी. कळलं मला. आवश्यके आमच्यासाठी पण आहेत. कारण आम्हालाही मोक्षाला जायचंय्! मग त्यासाठी आवश्यक क्रिया कराव्या लागतील... आणि आता मुनींची आवश्यके सांगणार ना?'

'मुलांनो, आता रात्र झाली आहे.... उद्या शाळेसाठी वेळेवर उठायचं आहे ना? त्यामुळे मुनींची आवश्यक कर्तव्ये आपण उद्या बघू या....! आता जिनवाणी स्तुती म्हणून झोपायला जायचे बरं का सगळ्यांनी!' – आजींनी समारोप केला.

सगळ्यांनी हात जोडून स्तुती म्हणायला सुरुवात केली –

हे जिनवाणी माता......!

(क्रमशः)

## मागील अंकाविषयी अभिप्राय....

सन्मति : जुलै अंकाचे मुखपृष्ठ, रचना आणि संपादकीय अतिशय सुंदर झाले आहे. नेमिनाथजी सरांचे संपादकीय वाचून खूप आनंद झाला. मुखपृष्ठावर स्थान मिळाल्यामुळे जैन कॉमिक्स अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यास नक्कीच मदत होईल, विशेषतः मराठी भाषिक घरांमध्ये...

आतापर्यंत जगभरातून १०,०००पेक्षा अधिक लोकांनी कॉमिक्स डाउनलोड करण्यासाठी ब्लॉगला भेट दिली आहे. आणि WhatsApp द्वारे फिरणाऱ्या PDFs ची संख्या तर याच्या काही पट अधिक आहे! आणि हे काम पुढेही अनेक वर्षं तितकंच सुसंगत आणि उपयुक्त राहील; कारण व्हिडिओ, रील्स किंवा लिखाणाच्या तुलनेत कॉमिक्सचा प्रभाव आणि आयुष्य अधिक दीर्घकाळ टिकणारे असते.
आपले आणि सन्मति मासिकाच्या सर्व संपादकांचे मनःपूर्वक आभार.

**वर्गणीदारांना विनंती...**

**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**


**भारतीय सहली,**
**परदेशी सहली,**
**तीर्थयात्रा,**
**हनिमून टूर्स,**
**विमान व रेल्वे तिकीट,**
**पासपोर्ट, विसा**

# गोमटेश टूर्स अँड ट्रॅव्हल्स

**गोमटेश कॉम्प्लेक्स, मेन रोड, कुपवाड**

* नवीन वर्षातील आयोजित टूर्स
* संपूर्ण देश–विदेशातील सहली आयोजित करणारी विश्वासू कंपनी
* भन्नाट धमाल, अविस्मरणीय क्षण–अनुभव गोमटेश टूर्सच्या माध्यमातून पूर्णपणे सुरक्षित.. परवडणारा दर आणि आपुलकीची सेवा ..!!

***सम्मेद शिखरजी, गुजरात, राजस्थान, नेपाळ, काश्मीर, आसाम, थ्री सिस्टर्स, अंदमान, केरळ, मध्यप्रदेश, त्रिस्थळी या सर्व यात्रेचे बुकिंग सुरू आहे.***

टीप : रेल्वे व विमानसाठी ट्रीपच्या तारखेच्या तीन महिने अगोदर बुकिंग करणे आवश्यक आहे.

**संपर्क क्रमांक – १) श्री. श्रेणिक चौगुले ९०९६६०३५१० २) श्री. रोहित चौगुले ९८३४६९१३६६ ३) श्री. पारिसा मुळे ८२०८८ ७२८२७ ४) ऑफिस क्रमांक ७८ २० ९९२२०९**

# पट्टमहादेवी– शब्दांपलिकडील अन्वयार्थ

(लेखांक - ३१)

**विपुल खेडकर,** नागपूर

काय होते पट्टमहादेवींच्या मनात ? कशाची तयारी त्या करीत होत्या ? कशाचे चिंतन सुरू होते ? या भागात वाचू या!

**सर्वेऽपि सुखिनः सन्तु....**

सर्व परिवारासोबत प्रारंभ केलेली श्रवणबेळगोळची यात्रा जवळपास चार महिन्यांच्या कालावधीनंतर, सर्व पूर्वस्मृतींना आठवत, तेथील लोकांशी बोलून, सगळ्यांची ख्याली- खुशाली विचारून, त्यांच्या मनात असणाऱ्या गोष्टी जाणून, शक्यतोवर पूर्तता करून, अथवा आवश्यक त्या सोयी, पाठशाला- नृत्यनाट्यशाला-साधना केंद्रे यासाठी राजकोषातून धन पुरवून शेवटास आली. परतता परतता सन्निधानांसोबत पंधरा दिवसांचा काळ व्यतीत करून, चर्चा-सान्निध्याचा आनंद घेऊन पट्टमहादेवी मोठ्या तीन राण्या पद्मलदेवी, चामलदेवी, बोप्पदेवींसोबत राजधानीत पोहोचल्या. युवराज-युवराज्ञींनी त्यांचे उत्साहाने स्वागत केले. आठ दिवस राहून तिघीही राण्या आपल्या गावी परतल्या. युवराज-युवराज्ञी देखील त्यांच्या नियोजित प्रांताकडे गेले. राजकुमार विनयादित्य राजधानीत परतले.

सर्व कामांची घडी युवराजांनी चांगली बसविली होती. आपली स्वतःची प्रशासनाची पद्धत त्यांनी ठरवली होती. त्यांनी केलेले सूक्ष्म स्वागतार्ह बदल दृष्टिपथात येऊन पट्टमहादेवी मनोमन आनंदित होत होत्या. राजकुमार विनयादित्यांमधील बदल लक्षात येऊन, या वयात दिलेले मर्यादित स्वातंत्र्य किती अनुकूल बदल घडवतात ते ध्यानात आले. आता राजकुमार विनयादित्य शिक्षणासोबतच राज्यकारभाराकडे सुद्धा लक्ष द्यायला लागल्यापासून क्वचित प्रसंगीच त्या तिकडे बघत. दोरसमुद्रमधे सुरु असणाऱ्या युगल मंदिरांचे काम पूर्णत्वाला आल्यामुळे तेथेही आता फार जायचे काम उरले नव्हते. एक प्रकारे सततची असणारी धावपळ आणि जबाबदाऱ्या यांचा भार उतरला होता....नव्हे उतरविला होता!

**ज्ञानाभ्यास की निवृत्तीचा अभ्यास....?**

चातुर्मासाकरिता आचार्यवरांचे आगमन झाले होते. गुरुवर्यांचे सान्निध्य, मिळालेली निवांतता, स्वतःच्या विचारातील होत असलेले प्रवर्तन याचा वेगळाच परिणाम साधला जात होता. मनातील द्वंद्व अवस्थेच्या काळात लाभलेले गुरुसान्निध्य, त्यातही सिद्धांतिदेव म्हणून ज्यांना ओळखले जाते, अशा आचार्य प्रभाचंद्रांचे सान्निध्य...! निवांतपणाच्या या काळात चरणानुयोग, द्रव्यानुयोग, प्रथमानुयोग अशा विविध विषयांच्या स्वाध्यायात मन रमत होते. 'अनंत हस्ते कमलवराने, देता किती घेशील दो कराने' अशी जणू पट्टमहादेवींची स्थिती झाली होती. त्यातच चिंतनात एकाग्र होऊन त्यांनी जणू स्वतःला सगळ्यातून अलिप्त केले होते. मात्र यामुळे मंत्रीगण चिंतेत पडले होते....! पट्टमहादेवींपेक्षा वयाने ज्येष्ठ असणाऱ्या मंत्र्यांना तर ही धोक्याची घंटी असल्याची जाणीव व्हायला लागली.

एके दिवशी प्रधान गंगराज पट्टमहादेवींना भेटायला राजमहालात आले. शांतलादेवींनी त्यांचे स्वागत करून त्यांना बसायला सांगितले आणि विचारले, 'कसे काय येणे केले, काही सांगायचे आहे कां ?'

'विचारावे की नाही, या संभ्रमात आहे.... त्यात विषय सरळ आपणाशी संबंधित आहे.... काही चूक झाली तर माफी असावी....! तसा मी पट्टमहादेवींपेक्षा वयाने खूप मोठा आहे......'

'आम्ही हे नाकारतच नाही ! या पूर्ण राज्यात, राज्यकारभार सांभाळणाऱ्यांमधे आपणच सर्वात ज्येष्ठ आहात ! आपण अजूनही सुचारू रूपाने राज्यकारभार सांभाळता याचा आम्हाला पूर्ण अभिमान आहे....हे आमचे सौभाग्य आहे.....!'

'जर ही भाग्याची गोष्ट असेल तर, आमची अभिलाषा अयोग्य ठरू नये की, पट्टमहादेवी आमच्यात अनंतकाळपर्यंत राहाव्यात !'

'हे आत्ता आपण सांगण्याचा काय प्रसंग ओढवला ?'

'माझी पत्नी लक्ष्मी दुर्दैवाने जेव्हा हे जग सोडून गेली, तेव्हाच व्यक्तिगतरीत्या मी निवृत्त होण्याचे ठरविले होते, हे जगजाहीर आहे..! मात्र आपण दोघांनी, सन्निधान आणि आपण, दोघांनीही मला त्या विचारातून बाहेर काढले आणि माझ्या कर्तव्यात पुनश्च आरूढ केले. राज्यासाठी माता सदृश, संसारात आदर्श, पूजनीय अशा आपण मात्र आता स्वतः मुक्तीच्या मार्गावर....असे ऐकले की सल्लेखनाव्रताकडे वाटचाल करीत आहात? आपणच विरक्त झाला तर आम्ही कोणासाठी श्रम करावेत ?'

'काय प्रधानजी, स्नेहभाराने दबून आपण हे बोलत आहात ना ? या स्नेहाला मी चुकीचे म्हणत नाही, पण आपण स्वतः मोठमोठ्या ग्रंथांचे स्वाध्यायी आहात! संयमाचा अभ्यास करणे काही गैर तर नाही ना प्रधानजी...आपणही एवढे अधीर व्हावे?'

'समाधी शब्द ऐकूनच मन आतंकित होणे साहजिकच नाही कां? शास्त्र कितीही समजत असले तरी मी विश्वनियमाला अपवाद तर नाही ना ! आपल्या मनाला कोणत्या चिंतेने घेरले ते समजून घ्यायला आलो आहे.... अशी कोणतीही चिंता असेल तर मनात ठेवू नका... आपण सगळे मिळून त्यावर विचार करू, तिला पळवून लावू... परंतु आपण आपल्या मूळ स्वरूपात, सळसळणाऱ्या उत्साहात वावरायला लागा... हीच प्रार्थना करायला आलो आहे...!'

'असे काहीच नाही! इतक्या काळानंतर मिळालेली शांतता, प्राप्त झालेले गुरुसान्निध्य यांचा जास्तीत जास्त उपयोग करणे सुरु आहे. आपण स्वतः करणानुयोगाचे जाणकार स्वाध्यायी आहात! एकदा मन स्वाध्यायाकडे ओढ घेऊ लागले की, बाकी सगळे निरर्थक जाणवायला लागते... पुनःचिंतन, पुनःमनन, पुनःस्वाध्याय यातच रमायला होते...! शिवाय आता आमच्यावरील भार समर्थपणे सांभाळायला तयार झालेले युवराज आणि राजकुमार असतांना आम्ही आमचे लक्ष तत्त्वचिंतनाकडे वळविणे गैर तर नाही ना?'

'मुळीच नाही... समजू शकतो आम्ही ! मात्र ते सल्लेखनेचे विचारही मनात आणू नका ! त्यासाठी पहिला क्रमांक आमचा आहे! ठीक आहे, आपली आज्ञा असेल तर येतो आम्ही !'

**गुंतलेल्या भावना... भावनांचे हिंदोळे**

प्रधानमंत्री गंगराज निघून गेलेत. चातुर्मास संपन्न झाला. गुरुवर्यांनी विहार केला. सन्निधानांना राजधानी सोडून आठ महिने होऊन गेले होते. हानुंगलमध्ये ते सध्या युद्धक्षेत्री विराजमान होते. सोबत राणी बम्मलदेवी होत्या. ज्या पद्धतीने पट्टमहादेवींशी सन्निधानांची विशेष आत्मीयता होती, तशीच या काही वर्षांत राणी बम्मलदेवींशी झाली होती. अनेकविध विषयांवर बोलणे होत होते. जेव्हापासून महाराजांनी धर्मपरिवर्तन केले होते, तेव्हापासून शांतलादेवींनी स्वतःला परिस्थितीनुरूप बदलले होते. महाराजांचे सुख, प्रजेचे हित हेच त्यांनी आपले लक्ष्य बनविले होते. स्वतःच्या सुखाचा विचारच केला नाही. प्रत्येक कृतीतून त्यांच्या उच्च बुद्धिमत्तेचे दर्शन घडायचे. त्यामुळे महाराजांना असे वाटायला लागले की, पट्टमहादेवी

चारित्र आणि ज्ञान या दृष्टीने आपल्यापेक्षा खूप श्रेष्ठ आहेत. कदाचित यामुळेच प्रेम-आदर यात कमतरता नव्हती, परंतु संवाद कमी झाला होता.

एक दिवस राणी बम्मलदेवींसोबत बोलतांना थोडे भावुक होऊन सन्निधान म्हणाले, 'देवी, मला असे वाटते की, मी माझ्या वागणुकीने पट्टमहादेवींना दूर केले.....'

'असे कसे होऊ शकते ? आपणावर त्यांची अपार श्रद्धा आहे. आपणाला सुखी ठेवण्यासाठी त्यांनी जो त्याग केला त्याचे मूल्य होणार आहे का?'

'तेच तर आमचे म्हणणे आहे ! त्यांच्या त्यागाचा आम्ही दुरूपयोग केला..... त्यांची मानसिक शांती हिरावून घेतली.... आणि आमची पण घालवून बसलो....!'

'तर सन्निधानांच्या मानसिक अशांतीचे कारण आम्ही आहोत....!'

'आम्ही कोणावर आरोप करीत नाही. राजनैतिक कारणांनी आम्ही आपणा दोघींशी विवाह केला, काही क्षण आमचे मन तुमच्याकडे आकर्षितही झाले होते.... परंतु त्यावर आम्ही नियंत्रण मिळवू शकलो असतो ! या विवाहाने काही वाईट झाले, असे नाही... उलट तुम्हा तिघींमधील जवळीक आणि स्नेह मनाला उत्साह देत असे ....परंतु....घाईघाईत केलेले धर्मांतर...आणि तेवढ्याच उतावीळपणे, मानसिक चंचलतेला बळी पडून एका अज्ञात कुल-गोत्र असणाऱ्या कन्येसोबत विवाह करणे..... हे सर्व आमचे एकापेक्षा एक मोठे अपराधच घडले ना...!'

'ते कसे? यातून ही सुखच मिळाले ना ! आम्ही आपणासाठी फलदायक ठरू शकलो नाही, वांझच ठरलो...परंतु छोट्या राणींनी अपेक्षित फळ दिले ना ?'

'त्यावेळी त्या राणींच्या सौंदर्यात आम्ही अडकलो, पुढे मात्र त्याच आमच्या मनाच्या अशांतीच्या कारण बनल्या.... आमच्यापेक्षाही पट्टमहादेवींच्या अशांतीला कारणीभूत ठरल्या. आता जेव्हा पंधरा दिवस आल्या होत्या ना, तेव्हा काय म्हणाल्या, माहिती आहे?.... माझ्या मुलांना सिंहासन नाही मिळाले तरी चालेल, मात्र अनेक लोकांच्या श्रम आणि बलिदानावर उभ्या झालेल्या या राज्याचे तुकडे नको व्हायला...! घरगुती कलह, वाद यामध्ये राज्याचा बळी न पडो...! मी हे बघू शकणार नाही!! जेव्हा पासून दासी मुद्दलाची हत्या झाली तेव्हा पासून माझ्या मनात विरक्ति निर्माण झाली आहे...'

'राज्याची सुरक्षा आणि एकता ठेवण्यासाठी या प्रकारचा त्याग पट्टमहादेवीच करू शकतात..!'

'मुद्दलासारख्या दासीची हत्या घडवून आणणाऱ्यासोबत आम्ही आत्मीयतेने कसे राहू? आम्हाला तर लक्ष्मीदेवीचे तोंडही बघावेसे वाटत नाही...!'

'मला असे वाटते, यातील बऱ्याच गोष्टी लक्ष्मीदेवींना माहित नसाव्यात....!'

'तरी देखील त्यांच्या मनात निर्माण झालेली महत्त्वाकांक्षा... स्वतःच्या पुत्राला सिंहासनावर बसविण्याची... माझ्या मनातून तर त्या पूर्ण उतरून गेल्यात....'

' बरेच झाले, आम्ही आई झालो नाही!'

' सगळ्याच लक्ष्मीदेवी नसतात !'

उदास चेहऱ्याने सन्निधान पुढे बोलू लागले, 'आमच्या मोठ्या बंधुराजांना अकाली मृत्यूने घेरले नसते तर....? आम्ही सिंहासनाधीन झालो नसतो ! किती बरे झाले असते ! पट्टमहादेवींनी आमच्या मातुश्रींना दिलेल्या वचनाचे त्या पालन करीत आहेत. मात्र आम्ही आमच्या वागणुकीने त्यांना दुःखच पोहोचवतो आहे ......! एवढ्या मोठ्या राज्याची निर्मिती करून आम्ही असे वणवण भटकत राहतो, ही त्याचीच साक्ष आहे.... हे असे एका जागी बसून राहिलो तर चिंता उफाळून येतील... यापेक्षा लवकरच हद्दोरेवर चाल करू या ! युध्दात गुंतलो की या गोष्टी मनात येत नाहीत...'

'स्वामी, रात्र बरीच झाली आहे....आपण

शांत झोपा बघू...!' सन्निधानांच्या मनातील घालमेल बघून त्यांना शांत करण्यासाठी बम्मलदेवींनी म्हटले.

दोन-तीन दिवसांतच सन्निधानांनी उत्तरेकडे आगेकूच केल्याचा समाचार गुप्तचरांकडून राजधानीला मिळाला. पाठोपाठ धान्यसंग्रह, सैनिक शिक्षण आदि कार्यांना गती आली. शस्त्रास्त्र निर्मितीचे कामही जोरात सुरू होते. पट्टमहादेवींना कामांतून उसंत मिळत नव्हती ..... मात्र मनात नेहमीसारखा उत्साह नव्हता.' राज्यनिर्माण आणि राज्य संचालनाच्या महत्त्वाकांक्षेने कसा हा नरमेध होतो आहे? सन्निधानांनी युद्ध संन्यास घेतला तर किती बरे होईल.... आता-आतापर्यंत आमच्यावर आक्रमण करणाऱ्यांवर, आमची भूमी हडपणाऱ्यांवर, आमच्या राज्यात अराजकता पसरविणाऱ्यांवर, आमच्या प्रजेच्या सुखात बाधा आणणाऱ्यांवर प्रतिहल्ला करणे हेच कर्तव्य होते... आता स्वतःहून आक्रमण..... सन्निधानांनी कां बरे असा विचार केला असेल ? मी तर सांगून आले होते की, माझ्या पुत्रांना राज्य मिळाले नाही तरी चालेल, मात्र हत्येचा व्यापार बंद व्हावयास हवा.... राज्याची एकता, अखंडता अबाधित राहायला हवी.... या युद्धासाठी मी हे सर्व काम करून अनुमोदना कां करू ? काम न करणे म्हणजे कर्तव्यच्युत होणे.... राज्याचे अहित करणे .....काम करणे म्हणजे स्वतःच्या विचारांपासून दूर पळणे... परत चक्रात अडकणे.... मला या सर्वांतून मोकळे व्हायचे आहे.....मी निवडलेला मार्गच योग्य आहे... या जगात कोणामुळे कोणाचे काही अडत नाही .....सर्व खरे असले तरी पट्टमहादेवी पद सोडण्याअगोदर सन्निधानांना कळविणे आपले कर्तव्य आहे. या युद्धपरिस्थितीत राज्य सोडून असे निघता येणार नाही.... काय करावे?' अशा विचारातच त्यांनी सन्निधानांना पत्र लिहायला घेतले.

'राजश्री महासन्निधानांच्या चरण कमली सविनय नमस्कार !

माझ्या वडिलांनी या शिवरात्री उत्सवाला शिवगंगा तीर्थावर जाण्याचा आग्रह धरला आहे. वयोवृद्ध असणारे ते परलोकाची तयारी मनात बाळगून आहेत. अशावेळी आपल्या भेटीची तीव्र आशा ते ठेवून आहेत. त्यांच्या सोबत आई, मी आणि विनयादित्य जातो आहोत. युवराज-युवराज्ञी, हरियलदेवी-मुले आणि जावई, छोटे बिट्टीदेव सगळ्यांनाच शिवगंगेला पोहोचण्यास सांगितले आहे. आपली आज्ञा घेऊनच यात्रा ठरवणार होतो, परंतु आता वेळ उरला नाही. आपणही बम्मलदेवी, राजलदेवींना घेऊन पोहोचाल तर प्रसन्नता होईल. माहित नाही का... पण मला देखील आपणास, सर्वांस भेटण्याची, सर्वांना बघण्याची इच्छा होते आहे....

या वेळी शिवगंगेमधे एक विशेष कार्य होणार आहे... तेथे शारदापीठ स्थापन होणार आहे. त्याच्या प्रतीकात्मक तेथे ज्ञान-बोध प्राप्तीची व्यवस्था करायची आहे. केवळ मूर्ती नको तर, ज्ञानकेंद्र हवे हा माझा आग्रह होता. मागील भेटीत तेथील धर्मदर्शीसोबत हे ठरले, पण आपणास कळवायचे राहून गेले .

आपण आलात तर आपल्या या चरणकमल उपासिकेला खूप आनंद वाटेल.

या प्रसंगी एक आणखी निवेदन करते.... आजकाल युद्ध मला नावडू लागले आहे. हे हिंसापूर्ण काम आत्मरक्षणाकरिता आवश्यक असेल तर गोष्ट वेगळी....विनाकारणच आपण चढाई करून हिंसा घडवायची.... मला नको वाटते! आपण जर या प्रवृत्तीपासून दूर झालात तर मला अपार आनंद होईल....अर्थात् सन्निधानांच्या आत्मगौरवात बाधा येणार नसेल तर....! आपल्या भेटीची वाट बघतेय्. माझी प्रार्थना स्वीकार करावी.'

-आपलीच

-शांतला

आपल्या मनःस्थितीचा अंदाज पत्रातून सन्निधानांपर्यंत पोहोचविला आणि तयारी करून

पट्टमहादेवी आईवडिलांना घेऊन, विनयादित्यच्या सोबतीने शिवरात्री महोत्सवाकरिता शिवगंगेकडे निघाल्या. वाटेत यादवपुरीला धाकट्या राणी लक्ष्मीदेवींकडे थांबून त्यांचे क्षेमकुशल जाणले. तेथूनच हरियल देवींना घेऊन त्या शिवगंगेला पोहोचल्या. थोरल्या तिन्ही राणी पद्मलदेवी, चामलदेवी आणि बोप्पदेवी सुद्धा दाखल झाल्या.

सन्निधानांना पत्र मिळाले. अभिप्राय वाचून ते विचारात पडले, 'रणांगणात सदैव समोर असणारी, अधिदेवी नावाने विख्यात असणारी, मलाच हरवणारी पट्टमहादेवी आता युद्ध संन्यासाकडे वळतेय् हे आश्चर्यच आहे...! एक वेळा सगळ्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त करीत आहे... पट्टमहादेवींच्या मनात काय आहे बरे ? कोणतीच गोष्ट न विसरणाऱ्या देवी, शारदापीठाची गोष्ट आम्हाला पंधरा दिवसात सांगू शकल्या नाहीत.....! नेमके काय झाले असावे....कशामुळे अशी विरक्ती आली असावी ?

एकदा चढाई केल्यानंतर मागे हटून तर चालणार नाही...परंतु पट्टमहादेवींनी भेटीची तीव्र अभिलाषा व्यक्त केली आहे....'

बराच विचार करून त्यांनी पत्र लिहायला घेतले, 'आपली मनोकामना पूर्ण करण्याची आमची सुद्धा इच्छा आहे. पण स्वतःच युद्धाला प्रारंभ केला असतांना मधेच माघार घेणे, हे आमच्या स्वाभिमानाच्या विरुद्ध होईल. तेव्हा काय करावे, या द्विधा मनःस्थितीत आम्ही आहोत. शिवरात्रीसाठी येणे तर शक्य होणार नाही... त्यानंतर आपण आणखी महिना-दोन महिने तेथेच असाल तर कळवावे. आम्ही जरूर येण्याचा प्रयत्न करू!' सन्निधानांचे पत्र वाचून पट्टमहादेवी आश्वस्त झाल्या.


आपल्या मनात एक उद्देश घेऊन निघालेल्या पट्टमहादेवींची आशा सन्निधान पूर्ण करतात का? पट्टमहादेवींची वाटचाल कोणत्या दिशेने होणार आहे...? वाचू या पुढील भागात....!!

(क्रमशः)

---

**वियोग वार्ता–**

## डॉ. एस. पी. पाटील सर, सांगली



मराठी व कन्नडचे ज्येष्ठ साहित्यिक, धारवाड युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डॉ. एस. पी. पाटील सर, सांगली (वय ८७) यांचा दि.११ जुलै २०२६ रोजी रात्री १२.००च्या दरम्यान सांगली येथे राहत्या घरी वृद्धापकाळाने स्वर्गवास झाला.

१९८१ ते १९९५ या काळात कन्नड सन्मती मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी कार्य केले आहे. तसेच अनेकांत शोधपीठ, बाहुबली येथील संशोधनपूर्ण कार्यास सहकार्य करीत होते. प्रगतीच्या कन्नड आवृत्तीचे संपादक होते. अनेक युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात सल्लागार म्हणून त्यांनी काम केले आहे. मराठी व कन्नड अशा अनेक पुस्तकांचे लेखन, समीक्षण, संपादन केले आहे. अनेक राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित होते. जैन साहित्यातील प्राच्यविद्येचे विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. श्रवणबेळगोळ येथील प्राकृत विद्यापीठाच्या माध्यमातून त्यांनी भरीव कार्य केले आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या आत्म्यास सद्गती व चिरशांती लाभो, अशी सद्भावना..!!

---

सुजाण वाचकांना नम्र निवेदन आहे की, सन्मति मासिकाच्या अंकांतील आपण वाचलेल्या साहित्याविषयी आपले अभिप्राय, सूचना इ. अवश्य कळवावेत.

आता **सन्मति मासिक हे ऑनलाईन** वाचण्यास उपलब्ध आहे. एकवेळ खालील वेबसाईटला अवश्य भेट द्या.

**www.sanmatimasik.com**

# अहिच्छत्र पार्श्वनाथ...?

( पूर्वार्ध)

**डॉ. स्वयंप्रभा पिरगौडा पाटील,** विश्रामबाग, सांगली.

प्राय: जैनसंस्कृतीमध्ये अहिच्छत्र प्रतिमा ही फक्त पार्श्वनाथांची बनवली जाते. (अहि म्हणजे साप आणि छत्र म्हणजे त्याचा फणा, त्या फण्यासहित प्रतिमा ती अहिच्छत्र प्रतिमा) ही परंपरा अतिप्राचीन आहे. मुख्यत्वेकरून दक्षिण भारतात याचे फार मोठे प्रस्थ आहे. अगदीच एका अखंड पाषाणात २४ तीर्थंकरांच्या प्रतिमा घडवायच्या असतील तरी अहिछत्रासाठी पार्श्वनाथांना मधोमध स्थान दिले जाते. सर्वजण पार्श्वनाथांना लांबूनच आणि पटकन ओळखू लागले ते अहिछत्रामुळेच. अहिछत्रासंबंधीचे इतर अनेक पुरावे देखील मोठ्या प्रमाणात मिळतील. संपूर्ण विश्वात असे एकही जिनमंदिर नसावे जेथे भगवान पार्श्वनाथ विराजमान नाहीत. चतुर्थकाळात जन्माला येवून चतुर्थकाळातच मोक्षाला गेलेले हे तीर्थंकर; पण सर्वप्रकारे सर्वत्र सर्वप्रथम यांचेच नाव घेतले जाते. यांना अनेकप्रकारची विशेषणे ही दिली जातात. जसे- त्यांच्या महिमेवरून उपसर्गहर, भयहर, संकटहर, अंतरिक्ष इत्यादी विशेषणे दिलेली आहेत. रंगावरून सावलिया, केशरिया इत्यादी तर आकृतीवरून सप्तफणी, सहस्रफणी इत्यादी विशेषणे दिलेली आहेत. दर्शनाच्या पुण्यलाभावरून कल्पतरू, चिंतामणी, चमत्कारी, सिद्धीप्रदायक, अतिशयकारी, कामधेनू इत्यादी प्रसिद्ध विशेषणे दिलेली आहेत. यांचा विशेष महिमा सांगतांना कवीवर बनारसदासजी म्हणतात.-

**जिन्हि के वचन उर-धारत जुगल-नाग,**
**भए धरनिंद-पदुमावती पलक में।**
**जाकी नाम-महिमा सौं कुधातु कनक धरैं,**
**पारस-पखान नामी भयौ है खलक में।।...**
**.....दीजै मोहि साता दृगलीला की ललक में।।**

नाटक समयसार, छंद ३

अर्थात् ज्या भगवान पार्श्वनाथांचे वचन आपल्या हृदयी धारण करून नाग-नागिनीचा जोडा क्षणार्धात देवगतीला प्राप्त झाला (इतकंच नाही तर) ज्यांच्या नामस्मरणामुळेच साध्या दगडाला देखील सोन्याचे मूल्य प्राप्त झाले (दगडाचा देखील उद्धार झाला.) पारस अशा नाममात्र-संपर्कामुळेच संपूर्ण पाषाण जातीमध्ये पारस पाषाण प्रसिद्धीस आला ...ते प्रभु पार्श्वनाथ मला शांती प्रदान करोत. पुनश्च यांच्याबाबतीत म्हटले आहे की-

**जो शरणागत भव्यजनों को, कर लेते हैं आप समान।**
**ऐसे अनुपम अद्वितीय पारस हैं पार्श्वनाथ भगवान।।**

तीर्थराज सम्मेदशिखरजीचा परिसर पारसनाथ या नावानेच ओळखला जातो. सर्वात उंच निर्वाणस्थल पार्श्वनाथांचेच आहे. देशभरातील काही क्षेत्राची, खेड्यांची नावे फक्त यांच्यामुळेच प्रसिद्धीला आली. जसे- कुंडल, शिरपूर, वशी, बाबानगर, कचनेर इत्यादी. गुणसाम्यता असूनही इतकी प्रसिद्धी इतर कोणत्याही तीर्थंकरांना मिळालेली नाही. कमठाने पूर्व दहा भवात वैर धारण केले पण पार्श्वनाथांच्या जीवांनी प्रत्येक वेळी उत्तम क्षमाच दाखविली, म्हणूनही यांच्यावर लोकांची विशेष श्रद्धा आहे.

जेव्हा या दुषमा हुंडावसर्पिणीच्या पंचम काळात मोक्षाचे दार बंद झाले, लोकांना साक्षात् समवशरणाचे सान्निध्य मिळेनासे झाले. केवलज्ञानरूपी सूर्य अस्ताला गेला. तेव्हा सर्वप्रथम जिनप्रतिमेची गरज भासू लागली. पर्वत/ पहाड पोखरून/ कोरून जिनप्रतिमा बनू लागल्या

पोखरल्यानंतर जिनप्रतिमेच्या वरील बाजूस जी पोकळी निर्माण झाली त्याला काही तरी आकार देणे प्रसंग प्राप्त झाले. तिथे कौतुकवश / सहज शिल्पकाराने फण्याचा आकार दिला असावा. अशा कितीतरी प्रतिमा आहेत जेथे फण्याचा आकार दिला गेला. एकाच ठिकाणी आसनाच्या खालच्या बाजूस चिह्न नसलेले अनेक पार्श्वनाथ याच कारणामुळे दिसत आहेत. कोठे कोठे स्वस्तिक चिह्न असलेल्या सुपार्श्वनाथांवर देखील अहिछत्र दिसते ते ही याच कारणामुळे असावे. (पाच फण्याचे ते सुपार्श्वनाथ व पाचाहून जास्त फण्याचे ते पार्श्वनाथ अशी ही एक गैरसमजूत पसरविण्यात भामट्यांना यश मिळाले आहे.) यावर कोणी आक्षेप ही घेतला नसेल, कारण त्या फण्याच्या संपर्कापासून संपूर्ण प्रतिमा सर्वथा अलिप्त होती. कोणाकडून प्रतिकार झालाच नाही; पण यामुळे आजपर्यंत पार्श्वनाथांच्या विग्रहांवर फणा असणे सामान्य जनतेच्या मनात चांगलेच ठासून राहिले. याची ही दुसरी बाजू कोणाला दिसली नसावी. भविष्याची पाऊले कोणाला ओळखता आली नसावीत की, पुढे जिनालयांचीही जनतेला गरज पडेल आणि तेव्हा या सर्पाकृतीचे अंधानुकरण केले जाईल. अनावश्यक व अयोग्यस्थानी त्यास स्थान मिळेल किंबहुना हे एका दुसऱ्याने ओळखल्याने त्याचा काही उपयोग या दुषमा काळात झाला नसावा. पुढे याचेच प्रस्थ वाढत गेलेले आहे. आज या परंपरेला प्राचीनता सुद्धा प्राप्त झाली.

याच दरम्यान अनेक मिथ्यामतांनी आपले डोके वर काढले होते. क्रियाकांडाला प्राधान्य देणाऱ्या लोकांनी आपली धर्मस्थळे उभी करण्यास सुरुवात केली असावी. तेव्हा (अंतिम शासन नायक) भगवान महावीरांचा धर्म तो जैनधर्म अर्थातच जैनधर्म हा अलिकडचा नवीन धर्म आणि वैदिकधर्म हा त्याहून प्राचीन धर्म आहे अशा मिथ्या प्रचाराने जोर धरला. त्यावेळी जैनधर्माचा प्रचार करण्यासाठी /जैनधर्माची सर्वाधिक प्राचीनता सिद्ध करण्यासाठी धर्मस्थळे/जिनालये निर्माण करून व त्यामध्ये महावीरपूर्व सर्व वर्तमान २३ तीर्थंकरांच्या प्रतिमा विराजमान करण्याची गरज आपल्या पूर्वजांना भासू लागली. यादिशेने वाटचाल सुरू झाली. २३ तीर्थंकरांच्या प्रतिमा विराजित होऊ लागल्या. भगवान महावीरांच्या पूर्व व लगतचे भगवान पार्श्वनाथ होते, म्हणून पार्श्वनाथ-प्रतिमा विराजित होण्याचे प्रमाण हे सर्वाधिक झाले.

यामध्ये अत्यधिक प्रभावना होण्याच्या उद्देशाने आपल्याच काही लोकांनी जैनेतर संस्कृती व परंपराचा अविवेकाने आधार घेतला. जैनेतर संस्कृतीमध्ये ज्या देवतांची लोकप्रियता अथवा प्रसिद्धी आहे. जे लोकांचे मनोरथ पूर्ण करतात. त्यांच्या सान्निध्यात साप हा आवर्जून दिसतो आहे. असे त्यांच्या निदर्शनात आले.-

जसे-जैनेतर संस्कृतीत सुविख्यात असलेल्या गणेशजींनी आपले पोट सापानेच बांधले आहे, भगवान विष्णूचे शय्यासन शेषनाग म्हणजे सापाचेच आहे. महादेवाचे आभूषण ही सापच आहे. श्रीकृष्णाचे खेळणे सापच आहे. मूर्तीच्या जवळपास दर्शनीय असा साप ठेवल्यास प्रभावनेच्या दृष्टीने त्याचा नक्कीच आपल्याला फायदा होईल.-असा विचार करणाऱ्या जैनलोकांनी पार्श्वनाथांच्या कथेचा भक्कम आधार घेतला. कोणतीही परंपरा सुरू होण्यामागे एक कथा ही जोडलेलीच असते. हे वाचकांना सांगण्याची गरज नाही. येथे ही तसेच झाले आहे.

या परंपरेमागील कथा संक्षेपामध्ये अशी कि - पार्श्वनाथांच्या जीवांनी पूर्वभवात अग्नीत जळत असलेल्या एका नाग-नागिनीच्या मरणासन्न जोडप्याला णमोकार मंत्र दिला होता. ते मरून धरणेंद्र पद्मावती झाले होते.-

**नाग जुगल सुनि जिनवचन, क्रूरजीव अतिनिंद।**
**देह त्यागि ततखिन भये, पद्मावती धरनिंद ।।**

कवि भूधरदास रचित पार्श्वपुराण ७/६७

तपश्चर्या करीत असताना मुनी पार्श्वनाथांवर

जेव्हा कमठाने घोर उपसर्ग केला तेव्हा त्याच नाग नागिनीच्या जीवांनी धरणेंद्र-पद्मावतीच्या भवनवासीयांच्या (नागकुमाराच्या) भवात उपकार स्मरून नाग-नागिनीच्याच रूपात (वेषात) येऊन मुनींच्यावर (सप्त) फणाचे सुरक्षाछत्र उभे केले होते. यक्ष-यक्षिणीने पार्श्व मुनींचे संरक्षण केले हे मानणे मात्र चूकीचे आहे.-

योगायोगाने पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या समवशरणात उपस्थित असलेल्या यक्षिणीचे नांव 'पद्मा' होते तर यक्षाचे नांव 'मातंग' होते. (तिलोयपण्णत्ति, चतुर्थ महाधिकार, ९४४/९४८) लोकांनी भवनवासी देव-धरणेंद्रांची पत्नी पद्मावती हिलाच यक्षिणी पद्मा असे समजले. यक्ष-यक्षिणी हे व्यंतरदेव होत. तर धरणेंद्र-पद्मावती हे भवनवासीदेव होत. आणि हे दोघे वेगवेगळे आहेत. जसे की तत्त्वार्थसूत्राच्या चतुर्थ अध्यायामध्ये सांगितले आहे. **-भवनवासिनोऽसुरनागविद्युत्सुपर्णाग्निवातस्तनितो दधिद्वीपदिक्कुमाराः ।।१०।। व्यंतराः किन्नर-किंपुरुषमहोरगगन्धर्वयक्षराक्षसभूतपिशाचाः।।११।।** नामसाम्यतेमुळे 'कहीं की ईंट कहीं का रोडा भानामतीने कुणबा जोडा' अशी करण्याची संधी येथे अज्ञानी लोकांना मिळाली होती. यक्षिणी पद्माने नव्हे तर भवनवासी (नागदेवता) पद्मावतीने पार्श्वमुनींच्यावर सुरक्षाछत्र उभे केले होते. यावरून पार्श्वनाथांचे रक्षक हे यक्ष-यक्षिणी नसून भवनवासी देवदेवी होते हे स्पष्ट होते.

पुनश्च येन केन प्रकारे जैन वीतरागी मूर्तीजवळ अज्ञानी लोकांना साप आणायचा होता. वरील कथेनुसार त्यांना ती ही संधी मिळाली. पार्श्वनाथांचे चिह्न साप होते. आणि त्यांनी पार्श्वनाथांजवळ पूर्णाकृतीत मूर्तिमंत साप आणला. याच धरतीवर उत्तरोत्तर मोठ मोठाले फणा विग्रहावर आल्या. नंतर पंचफणा, सप्तफणा व सहस्रफणा, नंतर त्याचे अनेक चमत्कार व त्यानंतर सापाच्या वेटोळ्यावरच (किंवा नेमके त्या फण्यावरच) प्रतिमा विराजित होऊ लागल्या. (वास्तवात सप्त/सहस्र फणाचा नाग असत नाही. धरणेंद्राने आपल्या विक्रिया-ऋद्धीच्या बळावर असे रूप धारण केले होते) व त्या उपसर्गाचे निवारण केले होते. त्याचेच प्रतीक म्हणून हे प्रतिमेला लावले गेले. (कोणी या छत्रास पार्श्वनाथांच्या लांछनातील सर्पाचे छत्र समजू नये. कारण कोणत्याही तीर्थंकरांचे लांछन/चिह्न त्यांच्या शरीरावर असत नाही.)

वैदिक संस्कृतीमध्ये परमेश्वरांकरिता पशू-पक्ष्याचे आसन लावले जाते. ही तर शुद्ध वैदिक परंपरा, परंतु जैनांनी हिचे ही अनुकरण केलेले दिसते. जैन संस्कृतीनुसार ही एक प्रकारची प्राणीपीडाच आहे. दुसरे असे की- जैनेतर समाजास अशा प्रतिमेवर ताबा मिळविणे सहज शक्य होणार आहे.

- असा हा चढता आलेख अजूनही चढत आणि चढतच चालला आहे. एखाद्या विस्तारलेल्या इमारतीच्या मजल्यावर मजले चढत जावेत त्याप्रमाणे विस्तारलेल्या फण्यावर फणा चढत गेले. सर्वात शेवटी एक कळस चढावा त्याप्रमाणे एक छोटुकला साप चढलेला असतो. पुनश्च याचेच एक विकृतरूप म्हणजे चमत्कार. योगायोगाने एखादा नाग मंदिराच्या वाटेने जात असताना कोणाला दिसल्यास अज्ञानीच्या जगात तो फार मोठा चमत्कार किंवा अतिशय होऊन बसते. अरिहंताच्या ३४ अतिशयामध्ये नागफणाचे नाव कोठेच आलेले नाही. वास्तविक पाहता वीतराग परिणतीशिवाय कोणतेही आश्चर्य (चमत्कार) किंवा अतिशय प्राप्त होत नसतात.

फण्यामुळे एक फायदा नक्कीच झाला होता. - छोटी प्रतिमा मोठी दिसू लागली होती. फण्याला हवा तो आकार किंवा नक्षी ही काढता येत होती. त्यामुळे लोकांचे भलतेच आकर्षण वाढत गेले. यासाठी चांगला प्रतिसाद ही मिळत गेला. यातच भर म्हणजे पार्श्वनाथांचे लांछन ही पायथ्याला (फक्त) साप होते. त्या सापालाही लोकांनी दर्शनीय व्हावे, म्हणून फणाधारी नागच बनविले. कारण या निमित्ताने

फणाधारी प्रतिमा विना तक्रार स्वीकारली जावी. हा त्यामागील त्यांचा हेतू होता. अहिछत्र/फणीमंडित पार्श्वनाथांच्या अनेक प्रतिमा बनविल्या गेल्या व नंतर त्याचे अनेकांनी भराभर अंधानुकरण केले. यासंदर्भात तत्कालीन समाजात जे लोक प्रबुद्ध होते. ते या अज्ञानापुढे हतबल झाले असावेत. त्यांनी आपली पुण्यहीनता जाणून मौन धारण केले असावे.

'पाषाण प्रतिमाओं में रूपायित तीर्थंकर पार्श्वनाथ भगवान' या आपल्या निबंधात 'पार्श्वनाथ प्रतिमाओं पर नाग-फण- व उपसर्ग निवारण : कुछ पौराणिक संदर्भ' अशा मथळ्याखाली श्री. नीरज जैन यांनी काही चिंतन प्रस्तुत केले आहे, ते पाठकांसाठी मी जसेच्या तसे भगवान पार्श्वप्रभू स्तुतिशतक या पुस्तकाच्या शेवटी (परिशिष्ट नं. १) दिले आहे.

वीतरागता हा जैनधर्माचा प्राण, भक्कम पाया आहे; पण या फणाधारी प्रतिमेमुळे वीतरागतेचा घात झाला. पाषाणाची उंची वाढली; पण परमात्मतत्त्व पार खाली कोसळले. गड आला पण सिंह गेला. प्रसिद्धी मिळाली; पण वीतरागता नष्ट झाली आणि यामुळे वीतराग-मंदिरात सरागी देवदेवतांना प्रवेश करणे सहज व सोपे झाले. हा सर्वात मोठा जैनांचा पराभव होता. या रीतीने अहिछत्र प्रतिमेच्या द्वारे ते (सरागी) देव जिनालयात प्रथम आत आले. व त्यांनी हळूहळू संपूर्ण कब्जा घेतला. (ते शासनदेवच बनून राहिले.) धूर्तांनी प्रथम वीतरागी जिनमुद्राच सरागतेत परिवर्तित केली आणि मग वीतरागतेच्या मंदिरात आपले स्थान कायमचे निश्चित (पक्के) केले. इतकंच नाही तर भगवंतांच्या बरोबर एकाच शिलेवर अंकित झाले, विराजित झाले. सारांश, असा की, येथून पुढे यक्ष यक्षिणीला महत्त्व प्राप्त होत गेले. फक्त पार्श्वनाथांच्या शेजारी नव्हे सर्वच्या सर्व तीर्थंकरांच्या शेजारी यक्ष व यक्षिणीचे आगमन झाले. हे सर्व पाहून असे वाटते की **पार्श्वनाथांवर खरा उपसर्ग कमठापेक्षा ही अधिक कलिकाळाच्या अज्ञानी जनतेनेच केला आहे, कारण कमठाने तर मुनी असताना उपसर्ग केला होता. अज्ञानीने साक्षात् परमात्म्यांवर उपसर्ग आणला. कमठाचा उपसर्ग तात्पुरता होता. या अज्ञानीने केलेला उपसर्ग कायमचा राहिला.**

अशाप्रकारच्या फणासहित प्रतिमेमुळे भगवंताची विराधना होत आहे. अनेक अडचणी निर्माण होत आहेत.-

१. प्राणप्रतिष्ठापनेच्या समयी प्रतिमेला चिकटून असलेल्या सर्पाकृतीवर देखील आपसूकच संस्कार होऊन ती सर्पाकृतीही प्राणप्रतिष्ठित होऊन जाते. जर फक्त चिह्नरूपाने सापाची आकृती राहिल्यास त्यावर प्राणप्रतिष्ठेचे संस्कार होत नाहीत, पण पूर्णाकृती पुतळ्यावर अवश्य संस्कार होत असतात.

२. या सर्पाकृतीमुळे मूळप्रतिमेचा जो भाग झाकाळला जातो तेथे मात्र मंत्र पोहचायचे राहतात. त्यामुळे प्रतिमा पूर्णपणे प्रतिष्ठित देखील होत नाही.

३. भल्या भल्या सम्यग्दृष्टी प्रतिमाधारी लोकांच्याकरवी देखील भगवंतांच्या प्रतिमेचे दर्शन/अभिषेक करीत असता त्या सर्पाकृतीचा देखील अनवधानाने विनय होऊन जातो. गंधोदक घेतले जाते. प्रक्षालनानंतर उचलून डोक्यावर घेतले जाते.

४. लघुकाय प्रतिमेचा अभिषेक करताना प्रथम फण्यावरच जल ढाळले जाते. महाकाय प्रतिमेचा अभिषेक करताना उक्त दोष टाळण्यासाठी फक्त समोरून अभिषेक करण्याची प्रथा प्रचलित झाली; परंतु या ही विधीमध्ये अभिषेक/प्रक्षालन प्रक्रिया अपूर्णच राहते. मूळ प्रतिमेचा काही भाग अभिषेकापासून वंचित राहतो.

५. अभिषेक विधी नंतर ज्या वस्त्राने भगवंताचे परिमार्जन होते, त्याच वस्त्राने सर्पाकृतीचे ही परिमार्जन केले जाते. पुन्हा तेच वस्त्र धुवून दुसऱ्या दिवशी याच कामी वापरण्यात येते. कोठे मुक्त जीवाचा परम औदारिक देह आणि कोठे सर्पाचे सप्तधातुमय अशुची औदारिक देह- यांची बरोबरी कशी बरे होईल?

६. कोठे कोठे तरी सहस्रफणी पार्श्वनाथांचा अभिषेक त्या सहस्र सर्पजिह्वांद्वारे उष्टे केलेल्या जलाने अथवा दुधाने होत आहे. यामुळे अनेक दोष निर्माण होत आहेत. अतिशयाच्या नावाखाली निरादरताच वाढत चालली आहे.

७. छत्र हे भगवंताचे प्रातिहार्य, (खरे वैभव) प्रभूंच्या उत्तमांगावर (मस्तकावर) लावण्यातच त्याची खरी शोभा; पण फणाधारी प्रतिमेमुळे ते नेमके सापाच्या डोक्यावर लावले जात आहे. हे कोणाच्याच का लक्षात येत नाही? स्वाभाविक तीन तीन दैवी छत्र असताना मध्येच अहिछत्राची गरज ती का भासावी? असेच भामंडलच्या बाबतीत ही समजून घ्यावे. भामंडलच्या आड नागाचे शेपूट येत आहे. जी पार्श्वनाथांची प्रतिमा प्रत्यक्ष फण्यावर विराजमान आहे, तिचे सिंहासन प्रातिहार्य अथवा वेदी गायब झाली आहे. यामुळे अशी सिंहासन/कमलासनविरहित असलेली प्रतिमा जैनेतर संस्कृतीचे अनुकरण करणारी वाटते.

८. सहस्रफण्याची प्रतिमा असेल, बारीक नक्षीदार शिल्प असेल तर प्रक्षाल विधीत अडचणी येतात. अशी प्रतिमा परिमार्जन करणे खूप कष्टाचे होते.

९. पंचकल्याणाच्या समयी पाषाणप्रतिमेस परमात्मा बनवित असताना सर्व विधी यथावत्‌च केल्या जातात. मुनी पार्श्वनाथांच्या प्रतिमेस केवली/तीर्थंकर पार्श्वनाथ परमात्मा बनवित असताना जवळ असलेले संपूर्ण परिग्रह म्हणजे पिंछी, कमंडलू इत्यादी काढून ठेवले जाते तेव्हा फणाधारी पाषाणप्रतिमेला लागलेला फणा दूर सारला जाऊ शकत नाही, त्यामुळे केवलज्ञानास योग्य ते संस्कार त्यावर करता येत नाहीत. मूळातच सग्रंथ असल्याने श्रीगुरू अशा प्रतिमेची जैनेश्वरी दीक्षाविधी ही करणार नाहीत. जिनदीक्षा देण्यास निर्ग्रंथ मुद्राच असावी लागते. याच प्रकारे गर्भ-जन्म-तप-ज्ञान-मोक्ष या पाचही कल्याणकात अडचणी येतील याचा सुज्ञांनी नक्कीच विचार करावा.

या गोष्टी टाळावयाच्या म्हटल्या तरी शक्य होणार आहेत का? अर्थातच नाहीत, म्हणून शहाण्या लोकांनी तरी फणीमंडित नवीन मूर्ती आणताना निश्चितच विचार करावा. पुनश्च काही विचारणीय बिंदू खालीलप्रमाणे-

१०. फण्यामुळे भोळ्या भाबड्या जनतेचे लक्ष्य प्रामुख्याने विविध आकार-प्रकारातल्या फण्याकडेच सर्वप्रथम खेचले जाते. जिनमंदिरात येऊन सुद्धा जिनबिंब दिसून ही वीतरागतेच्या आराधनेचे, उपासनेचे काम बाजूलाच राहून जाते. पाषाणातील सौंदर्य टिपण्यापेक्षा वीतरागतेचे सौंदर्य टिपता आले पाहिजे. सुंदरशिल्प निर्माण करण्याच्या नादात वीतरागताच खरडली जात आहे.

११. जैनागमामध्ये बाह्य परिग्रह हा दोन प्रकारचा सांगितला आहे- १) चेतन २) अचेतन. जैनकथासाहित्यामध्ये अकलंक व निष्कलंकाच्या प्रसिद्ध कथेमध्ये एक प्रसंग येतो की, जैन प्रतिमेवर (अचेतन) वस्त्राचा एक धागा टाकून ती प्रतिमा परिग्रहसहित केली होती. येथे तर साक्षात चेतन परिग्रहाचा स्पर्श होत आहे तेव्हा काय बरे करावे? जैन प्रतिमा ही वीतरागी व निर्ग्रंथच असते; पण काही हौशी भक्त या फण्यासच सोन्या चांदीने सजवून आपली हौस भागवून घेतांना दिसतात. यापुढे ही जाऊन काही जण नागपंचमीला तेथे दूध ही आणून ठेवतात हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. अशाप्रकारच्या घोर अज्ञानसहित असलेल्या क्रियेला अहिछत्रामुळेच हळूहळू आश्रय मिळत गेला.


नाग तर दूरच राहो (पण) पुष्पवृष्टी नावाचे एक प्रातिहार्य आहे. देवलोकातील देव फुलांची वर्षा करीत असतात. त्यातील एक फूल ही भगवंताना स्पर्श करीत नसते. सर्व फुले भगवंताच्या आजूबाजूलाच पडत असतात. भगवंतावर नाही.

**( दुसरा भाग पुढील अंकात...)**

( दुसरा भाग पुढील अंकात...)

# वाचू आनंदे, लिहू नेटके!

**पुस्तक समीक्षण...**




पुस्तकाचे नाव–

## दिवास्वप्न

**श्री उद्धर अशोक चवरे,** BSL, LLB.(कारंजा लाड)

**मूळ गुजराती लेखक– श्री. गिजूभाई बधेका**

**मराठी अनुवाद – शोभा भागवत**

**डोळस स्वप्न–**

काहीतरी कारणाने त्या दिवशी माझा आवाज माझ्या पाच वर्षांच्या मुलावर चढला होता.... आणि रात्री बाबांनी टेबलावर ठेवलेले दिवास्वप्न पुस्तक माझ्या हातात आले. एका बैठकीत संपू शकेल असे छोटेसे पुस्तक!

गिजुभाई बधेका लिखित व शोभा भागवत यांनी अनुवादित केलेले हे पुस्तक म्हणजे शिक्षक, विद्यार्थी, खरे शिक्षण आणि मुलांचे भावविश्व यांची आदर्श सांगड कशी असावी याचे डोळसपणे पाहिलेले स्वप्न!! पालक आणि शिक्षकांना जागे करण्यासाठी लिहिले गेलेले एक अस्वस्थ करणारे पण तितकेच आश्वासक पुस्तक!!

पुस्तक जुने असले तरी, आजही तेवढेच वास्तविक वाटणारे आहे. कधी विनोद पेरत, तर कधी अंतर्मुख करत अडचणी व त्यावर उपाय यांची जुगलबंदी वाचकाला जणू खिळवून ठेवते.

**मुलांच्या मनापर्यंत पोहचणारा प्रवास–**

पुस्तकाची सुरुवातच मुलांच्या मनातील धाक आणि खरी शिस्त यातील फरक दाखवते. 'मार बसेल म्हणून शांत राहणे' ही शिस्त नसते; संधी मिळताच गोंधळ घालणारे मूल हे भीतीत जगत असते, समजून घेतलेले नसते, ही जाणीव हे पुस्तक वारंवार करून देते.

येथून पुढे सुरू होतो मुलांच्या मनापर्यंत पोहोचण्याचा प्रवास. गोष्टी सांगणे, त्यातून मुलांचा मित्र होणे, त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे, या साध्या वाटणाऱ्या गोष्टींना गिजुभाई शिक्षणाचा पाया बनवतात. पाठ्यपुस्तकांच्या रक्कमेतून वाचनालय उभे करण्याची कल्पना ही फक्त शिक्षणपद्धती नाही तर मुलांना 'वाचनाचा आनंद' देण्याची दृष्टी आहे.

खेळ, हार–जीत, भांडणे, या जगात रोज घडणाऱ्या घटनांतून शिक्षण कसे जन्म घेते, या गोष्टी हे पुस्तक अतिशय जिवंतपणे दाखवते. सुरुवातीला फक्त खेळ वाटणारी गोष्ट हळूहळू सहकार्य, स्वयंशिस्त, समजूतदारपणा आणि शेवटी शिक्षणापर्यंत पोहोचते. म्हणूनच हे पुस्तक वाचणे म्हणजे केवळ शिक्षणशास्त्राचा अभ्यास नव्हे, तर बालपण समजून घेणे आहे!

**शिकणे म्हणजे काय?**

परीक्षेत 'पास–नापास', 'मिळणारे गुण', 'पहिला क्रमांक' या पलिकडे जाऊन मुलांनी शिकणे म्हणजे काय, याविषयी हे पुस्तक नव्याने समजावते! एकमेकांना शिकवणे, आनंदासाठी शिकणे, अनुभवातून शिकणे, हेच खरे शिक्षण आहे असे ते सांगते. व्याख्या पाठ करून नाम, सर्वनाम, क्रियापद शिकवण्यापेक्षा खेळातून, संभाषणातून, कृतीतून भाषा शिकवणे किती नैसर्गिक असू शकते, हे वाचताना प्रकर्षाने जाणवत राहते.

पाहुण्यांसमोर मुलांकडून घासून–पुसून पाठ केलेले कृत्रिम प्रदर्शन करून घेण्याची प्रवृत्ती टाळून नायक मुलांना त्यांच्या वयानुरूप छोट्या गोष्टींचे नाट्यरूपांतर करू देतात. तिथे बक्षीस, टाळ्या किंवा वेशभूषेपेक्षा 'सहभागाचा आनंद' महत्त्वाचा ठरतो, ही गोष्ट मनाला फार सहज स्पर्शून जाते.

भूगोलासारखा कठीण वाटणारा विषयही ते

मुलांना अनुभवातून शिकवतात. चित्रकला... त्यातून प्रथम शाळेचे चित्र, मग शाळेचा नकाशा, नंतर गाव, देश, खंड असा विस्तार होत जातो. मुलांच्या समजुतीच्या वतुर्ळातून सुरू झालेला हा प्रवास अभ्यासक्रमाच्या चौकटी ओलांडून जातो. शिक्षण म्हणजे पाठांतर नव्हे, तर जगाशी जोडले जाणे आहे, हे ते नकळत शिकवून जाते.

हे पुस्तक वाचताना सतत स्वतःकडे पाहावे लागते. आपण मुलांना खरंच ऐकतो का? त्यांच्याशी बोलतो की फक्त सूचना देतो? आपण त्यांना शिकवतो की त्यांच्याकडूनही काही शिकतो? असे अनेक प्रश्न मनात उभे राहतात.

**दिवास्वप्न** हे केवळ शिक्षणावरील पुस्तक नाही; ते मुलांकडे पाहण्याची दृष्टी बदलणारे पुस्तक आहे आणि म्हणूनच अतिशय वाचनीयही!! (गुगलवर सर्च केल्यास Pdf सहज उपलब्ध आहे.)

---



## डॉ. दिलीप रमेश गहाणकरी यांचा विशेष सन्मान

डॉ. दिलीप रमेश गहाणकरी हे ऑस्ट्रेलियामध्ये कार्यरत असलेले ख्यातनाम प्लास्टिक व कॉस्मेटिक सर्जन आहेत. डॉ. दिलीप हे कारंजा-लाड नगरीचे सुपुत्र असून त्यांचे वडील स्व. श्री. रमेश केशरीलालजी गहाणकरी हे कारंजा गुरुकुलाचे स्नातक होते.

सौंदर्यवर्धक (Aesthetic) तसेच पुनर्रचनात्मक (Reconstructive) शस्त्रक्रियांमध्ये त्यांचे विशेष प्रावीण्य आहे. भारतातील, विशेषतः मेळघाटातील त्यांच्या उल्लेखनीय मानवतावादी कार्यासाठी त्यांना नुकताच **ऑस्ट्रेलिया सरकारचा प्रतिष्ठेचा ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया मेडल (OAM)** पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

डॉ. गहाणकरी दरवर्षी विदर्भातील मेळघाटात शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करतात. या शिबिरांमध्ये ते गंभीर भाजल्यामुळे निर्माण झालेल्या विकृती, जन्मजात व्यंग, तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या विकृतींवर मोफत शस्त्रक्रिया करून अनेक गरजू रुग्णांना नवे जीवन देतात. अशा आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या आणि समाजसेवेसाठी स्वतःला वाहून घेतलेल्या व्यक्तिमत्त्वाचा कारंजा-लाड जैन समाज व इंडियन मेडिकल असोसिएशन (शाखा-कारंजा लाड) तर्फे दि.१८ जून २०२६ रोजी कारंजा येथे सन्मान करण्यात आला.

## विनम्र निवेदन

**१) भद्रायण –** गुरुदेव समंतभद्र महाराज यांचे मुलांसाठी व संक्षिप्त रुचीवाल्या श्रावकांसाठी १८८ पानांचे पुस्तक आता अनुपलब्ध आहे. एका वर्षात याच्या सर्व १००० प्रती संपल्या आहेत. अत्यंत उपयुक्त व रोचक असे हे पुस्तक आहे. त्याची दुसरी आवृत्ती छापली जात आहे.

**२) गुरुकुल पूजापाठ –** हे पूजनाचे पुस्तक खास करून गुरुकुलातील मुलांसाठी नित्य पूजन करता यावे यासाठी छापले जात आहे. दोन वर्षापूर्वी १००० प्रती छापल्या होत्या. आता याची ही दुसरी आवृत्ती छापली जात आहे. **या पुस्तकांना दानराशी देऊन सहकार्य करावे.**

**संपर्क :** श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, मोबा. नं. ९०४९४ ७३४३४

# विचारांचे जीवाणू आणि विषाणू

मी आयुष्यभर सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (Microbiologist) म्हणून काम केले.

आज जवळपास ९० वर्षांचा झालो असलो, तरी सूक्ष्मदर्शकाखाली दिसलेली ती दुनिया अजूनही माझ्या विचारांत असते.

जीवाणू (Bacteria) आणि विषाणू (Virus) दोघेही अत्यंत सूक्ष्म असतात.

✻ दोघेही उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत.

✻ दोघांमध्येही एखाद्या शरीराचे भवितव्य बदलण्याची क्षमता असते. पण त्यांच्यातील एक फरक असा आहे, जो आयुष्यभर माझ्या मनात कोरला गेला आहे.

जीवाणू स्वतःचे स्वतंत्र जीवन जगू शकतो.

तो वाढतो.

तो विभाजित होतो.

तो वसाहती निर्माण करतो.

विषाणू मात्र वेगळा असतो.

तो स्वतःहून जगू शकत नाही.

त्याला एका यजमानाची (Host) गरज असते.

तो जिवंत पेशीत प्रवेश करतो आणि त्या पेशीचाच वापर करून स्वतःची संख्या वाढवतो.

वय वाढत गेले तसे मला जाणवले की माणसांचे जीवनही अशाच दोन शक्तींनी घडत असते.

आपल्यामधील काही गोष्टी जीवाणूंप्रमाणे असतात...

✻ चांगल्या सवयी

✻ शिस्तबद्ध मन

✻ उदार हृदय

✻ संयमी शब्द

या गोष्टी हळूहळू वाढतात. शांतपणे विस्तारतात आणि जीवनाच्या अदृश्य कोपऱ्यांत आरोग्य निर्माण करतात.

पण काही गोष्टी विषाणूंप्रमाणे असतात...

✻ भीती

✻ मत्सर

✻ राग

✻ द्वेष

✻ स्वतःला सिद्ध करण्याची धडपड

या गोष्टी नकळत आपल्या मनात प्रवेश करतात आणि मग आपल्या स्वतःच्याच ऊर्जेचा उपयोग आपल्याविरुद्ध करतात.

विषाणू दार ठोठावून येत नाही...

कटुता देखील तशीच येते.

अहंकारही तसाच येतो.

पश्चात्तापही तसाच येतो.

सुरुवात खूप छोटी असते...

✻ एक विचार

✻ एक जखम

✻ एक तुलना

✻ एक वाक्य, जे आपण वर्षानुवर्षे मनात पुन्हा पुन्हा जगत राहतो.

आणि...... हळूहळू आपण अशा गोष्टींचे वाहक बनतो, ज्या पसरवण्याचा आपला कधीही हेतू नव्हता.

९०व्या वर्षी मला हे समजले आहे... जीवन फक्त आपण बाहेर काय उभे करतो याबद्दल नसते, ते याबद्दलही असते की आपण आपल्या आत काय वाढू देतो.

दररोज आपल्या आत काही ना काही वाढत असते...

✻ शांतता की गोंधळ?

✻ कृतज्ञता की तक्रार ?

✻ धैर्य की भीती ?

✻ क्षमाशीलता की विष ?

सूक्ष्मदर्शकाने मला एक धडा शिकवला आणि वयाने त्याची खात्री पटवून दिली.

सर्वात सूक्ष्म गोष्टी अनेकदा सर्वात मोठ्या जीवनांवर नियंत्रण ठेवतात. म्हणून...

✻ तुम्ही कोणत्या गोष्टींना आश्रय देता याबाबत सावध रहा.

✻ काय वाढवत आहात याबाबत सावध रहा.

✻ काय पुढे देत आहात याबाबत सावध रहा.

कारण .... आपले शब्द कृती बनण्याच्या खूप आधी, ते आपल्या आत अदृश्य स्वरूपात जीवन धारण करतात.

Dr. Chandrasekhar Bode
Retired at Ministry of Health & Family Welfare, Government of India
यांच्या पोस्टवरून साभार

---

**काव्य....**

## तत्त्वार्थसूत्र महिमा

(अनुप्रास)

तत्त्वार्थसूत्र तेजोमय,
तत्त्वांचा तो तारक ठेवा,
त्रैलोक्याचे तंतोतंत,
तत्त्वज्ञानाचा तेजस्वी मेवा...

दशोध्याय,त्रिशत सप्तपन्नास
सूत्रांचा थोर आहे साज,
'वंदे तद्गुणलब्धये',
वंदनातून खुलतो मोक्षराज...

उमास्वामी उदात्त उराचे,
उज्ज्वल उपदेशांचे उद्गाते,
उत्तम उपकारांनी उलगडती,
आत्मोन्नतीचे अमृतपाते....

सम्यक् श्रद्धा, सम्यग्ज्ञान,
सम्यक् चारित्राची सुंदर वाट,
संसारसागर सहज सरावा,
साधक साधे सिद्धीघाट....

कर्मकणांचे क्षालन करून,
कलुषित काया करते निर्मळ,
कषाय, क्रोध, कपट, लोभ
करिते कायम पूर्ण विफल...

विश्ववस्तूंचे व्यापक वर्णन,
विवेक-विज्ञानाचा विलास,
तत्त्वतत्त्वांचा तेजोदीप,
तरवी जीवांचा भवप्रवास....

मोक्षमार्गाचा मंगल मंत्र,
मनामध्ये ममतेने मुरतो,
मिथ्यात्वाचा मल हरपून,
मुक्तीचा महामार्ग खुलतो...

तत्त्वार्थसूत्र त्रिभुवन-तारक,
तप-त्यागाचा दिव्य ध्वज
मोक्षाच्या मार्गापर्यंत नेणारे
विश्व तत्त्वांचे ते भव्य तेज...

**सुदर्शन टोपरे,**
अंजनगाव सुर्जी
९४२१७३६३७८

✻✻✻✻✻

---

## बाहुबली गुरुकुलासाठी बृहद्दानराशी...



**सौ. मेघा पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार घाडगे-पाटील इंडस्ट्रीज लिमिटेड उचगाव कोल्हापूर यांच्यावतीने व डॉ. नेमिनाथ शास्त्री यांच्या प्रयत्नाने बाहुबली आश्रम गुरुकुलातील मुलांच्यासाठी रुपये १० लाख ५० हजार इतकी दानराशी मिळाली.**

**ही दानराशी कंपनी सेक्रेटरी श्री. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी स्वीकारली.**

# जैन साहित्य में ध्यान, योग और आत्म स्थिरता

**डॉ. वन्दना (शिक्षाविद्)** ६३१, मिन्चा वाली गली, हनुमान मंदिर के पास,
लाडो सराय क्रोसिंग, नई दिल्ली– ११००३०
Mob. 8005822517 EMAIL- canjel36@gmail.com

इस आधुनिक युग और अस्थिर दिनचर्या में मानव जीवन निरन्तर तनाव और असंतोष से ग्रस्त होता जा रहा है। ऐसी स्थिति में ध्यान एक साधन के रूप में आत्मस्थिरता की प्राप्ति हेतु अत्यन्त महत्त्वपूर्ण सिद्ध होता है। ध्यान न केवल मानसिक शान्ति प्रदान करता है, बल्कि व्यक्ति को आत्म-जागरूक, आत्म संतुलन एवं आन्तरिक शक्ति का अनुभव भी कराता है। भारतीय संस्कृति में ध्यान का स्थान अत्यन्त महत्त्वपूर्ण है। वेद, पुराण, उपनिषद, बौद्ध और जैन परम्परा आदि सभी ने ध्यान को आत्मिक उन्नति का साधन माना है।

प्राकृत भाषा में रचित जैन आगमों में ध्यान का विस्तृत वर्णन मिलता है। जैनाचार्यों ने ध्यान को न केवल आत्मशुद्धि का उपाय माना है, बल्कि मोक्ष प्राप्ति का प्रधान साधन भी प्रतिपादित किया है। वही दूसरी ओर योग को आध्यात्मिक साधना तथा आत्म विकास की एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया माना है। प्राकृत आगम साहित्य में स्पष्ट उल्लिखित है कि मन, वचन, काय के बिना ध्यान, योग में एकाग्रता का होना सम्भव नही है। ध्यान वह क्रिया है जिसके द्वारा बुद्धि एवं भावनाओं का सामंजस्यपूर्ण नियंत्रण अथार्त तनाव को दूर किया जा सकता है। बाह्य इन्द्रियों के प्रयोग के बिना केवल अन्तरिक भाव तथा चेतना की क्रिया ध्यान कहलाती है। व्यक्ति बाहरी उपलब्धियों में तो प्रगति कर रहा है, परन्तु आन्तरिक शान्ति और मानसिक सन्तुलन की दृष्टि से वह लगातार अस्थिर होता जा रहा है। वर्तमान समाज में मानसिक तनाव, अवसाद और असंतोष जैसी समस्याएँ बढ़ रही हैं। ऐसे समय में ध्यान, योग और आत्म-स्थिरता का अध्ययन केवल सैद्धान्तिक महत्व का विषय नहीं है, बल्कि यह मानव जीवन की अनिवार्य आवश्यकता बन गयी है। विभिन्न दार्शनिक परम्पराएं विशेषकर भारतीय दर्शन, ध्यान को आत्मसाक्षात्कार और आत्म-स्थिरता का अनिवार्य साधना मानती हैं।

**कूट शब्द –** ध्यान, योग, चेतना, आत्मस्थिरता, आत्मशुद्धि, मानसिक शान्ति, आध्यात्मिक साधना, आत्मसाक्षात्कार, आगम, भारतीय दर्शन, मोक्ष।

**प्रस्तावना–**

भारतीय आध्यात्मिक परम्परा में ध्यान, योग के विषय में जैनाचार्यों ने प्राकृत भाषा में जो साहित्य रचा, उसमें ध्यान और आत्म-स्थिरता को मोक्षमार्ग का अनिवार्य साधन माना है। ध्यान केवल मानसिक एकाग्रता ही नहीं, बल्कि आत्मा की शुद्धि और स्थिरता की वह अवस्था है जिसमें राग-द्वेष का क्षय होता है और साधक आत्मस्वरूप का अनुभव करता है। योग में ध्यान का बहुत महत्त्वपूर्ण स्थान है। मन (चित्त) कभी स्थिर नहीं रहता और किसी भी ध्येय वस्तु पर अधिक समय तक ध्यान ठहरता भी नहीं। अतः ग्रंथों में सर्वप्रथम चित्त की विकलता दूर कर उसे स्थिर करने का निर्देश देते हुए कहा गया है- **चित्त णिरोहे झाणं।** इसके लिए यम, नियम, आसन, प्राणायाम और तप आदि क्रियाओं का विधान ग्रंथों में किया गया है, ताकि साधक इनके सम्यक् पालन से मन की चंचलता, विकलता हटाकर तथा उसे अन्तर्मुख कर अपने ध्यान को आत्मा पर केंद्रित कर सके। आचार्य कुन्दकुन्द के समयसार, नियमसार में ध्यान को आत्म-स्वरूप में स्थित रहने का साधन बताया गया। उत्तराध्ययन सूत्र में ध्यान को संयम और समाधि से जोड़ा गया। ध्यान योग के महत्त्व को भिन्न-भिन्न भाषाओं में महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त है।

पातंजल योगसूत्र में योग के आठ अंगों में ध्यान और साधना का अंग है। योगसूत्र में ध्यान की परिभाषित करते हुए कहा है **'तत्र प्रत्ययैकतानता ध्यानम्'** अर्थात् जब चित्त किसी एक तत्त्व पर निरन्तर एकाग्र हो तथा शरीर का समान मुद्रा मे बने रहना ध्यान है, महर्षि कपिल कहते हैं **'ध्यानं निर्विषयं मनः'** अर्थात् ध्यान करते समय अन्य किसी भी विषय में मन का न जाना, उसी में रहना ध्यान है।

बौद्ध दर्शन में भी वैदिक दर्शनों की भांति ही ध्यान की महत्ता को दर्शाया गया है जिसमें कहा गया है– अपने चित्त को ध्यान मे लगओ, प्रमाद मत करो। प्रज्ञाविहीन पुरुष को ध्यान मे आत्म स्थिरता नहीं होती है, ध्यान न करने वाले को प्रज्ञा अर्थात् आत्मिक ज्ञान नहीं हो सकता, जिसमें ध्यान और प्रज्ञा दोनोहैं वही निर्वाण को प्राप्त कर सकता है,–

**नत्थि झानं अपञ्जस्स पञ्जा नत्थि अझायतो।**
**यम्हि झानञ्च पञ्जा च स वे निब्बानसन्तिके।।**

प्राकृत जैन साहित्य आत्म–स्थिरता को समता, संयम और आत्म–नियंत्रण से जोड़कर देखता है। नियमसार में कहा गया है– 'आत्मा का स्थिर रहना ही उसका स्वभाव है।' यह स्थिरता राग, द्वेष, मोह और वासनाओं से मुक्त होकर ही संभव है। उसे परिष्कृत करते हुए जैनाचार्य उमास्वाति तत्त्वार्थसूत्र में परिभाषित करते हुए कहते हैं– **'ध्यानं निर्विचारं चित्तस्यैकाग्रता'** अर्थात् चित्त का स्थिर और निरोधात्मक स्वरूप ही ध्यान है। जैन साधना पद्धति में मन की गति शून्य करने की अपेक्षा मन की गति को बदलने पर जोर दिया गया है। जैन ग्रंथों में ध्यान की अनेक परिभाषाएँ मिलती है, –

१. मन की एकाग्र अवस्था ध्यान है।
२. मन, वचन, काय की प्रवृत्ति का निरोध करना ध्यान है।
३. एक विषय पर मन को स्थिर करना ध्यान है।

प्राकृत ग्रन्थों में कहा गया है कि ध्यान 'वर्तमान क्षण' में जीने का अभ्यास है। भूत और भविष्य की चिन्ता से मुक्त होकर वर्तमान पर केन्द्रित रहना ही आत्म स्थिरता का मूल है। ध्यान करने से आचरण शुद्ध होता है और राग–द्वेष से मुक्त होकर जीव अहिंसा, सत्य और संयम का पालन कर सकता है।

**प्राकृत साहित्य में ध्यान का स्वरूप–**

१. ध्यान का मूल अर्थ है– चित्त को एकाग्र कर आत्मा के स्वरूप में स्थिर होना। योग दर्शन के अनुसार मन (चित्त) को स्थिर कर आत्मचिन्तन करते हुए भगवान के एक ही प्रत्यय में लीन हो जाना ही ध्यान है। ध्यान का तात्पर्य चित्त की एकाग्रता और आत्मा की ओर उन्मुखता से है। समयसार में कहा गया है– आत्मा अपने स्वरूप में स्थित होकर जब परद्रव्य का आसक्ति–रहित अनुभव करती है, वही ध्यान है। ध्यान को योग शास्त्र में आचार्य हेमचन्द्र ने इस प्रकार दर्शाया है–

**ध्यानं विधित्सता ज्ञेयं ध्याता ध्येयं तथा फलम्।**
**सिध्यन्ति न हि सामग्रीं विना कार्याणि कर्हिचित्।।**

ध्यान करने की इच्छा रखनेवाले साधक को तीन बाते जान लेनी चाहिए –

१. ध्याता– ध्यान करनेवाले में कैसी योग्यता होनी चाहिए।
२. ध्येय–जिसका ध्यान करना है, वह वस्तु कैसी होनी चाहिए ?
३. ध्यान के कारणों की समग्रता, अर्थात् सामग्री कैसी हो, क्योंकि सामग्री के बिना कोई भी कार्य सिद्ध नहीं होता है।

ध्यान के विषय में ध्यान योग में कहा गया है तदनन्तर प्रत्येक पत्र पर भ्रमण करते हुए, आकाशतल में विचरण करते हुए, मन की मलीनता को नष्ट करते हुए, अमृत रस को बहाते हुए, तालुरन्ध्र से जाते हुए, भ्रकुटि के मध्य में सुशोभित होते हुए, तीनों लोको में अचिन्त्य माहात्म्यवाले, मानो अद्भुत ज्योति–स्वरूप, इस पवित्र मन्त्र का एकाग्र मन से ध्यान करने से मन और वचन की मलीनता नष्ट हो जाती है और श्रुतज्ञान का प्रकाश होता है। आचार्य उमास्वाति विरचित तत्त्वार्थसूत्र में ध्यान को इस प्रकार दर्शाया

गया है-

उत्तमसंहननस्यैकाग्रचिन्तानिरोधो ध्यान-मान्तर्मुहूर्तात्। आचार्य उमास्वामी तत्वार्थसूत्र में कहते हैं, विकल्पों से हटाकर मन को केन्द्रित करना ध्यान कहलाता है। उत्तम संहनन अर्थात् वज्र वृषभनाराच, वज्रनाराच और नाराच संहननों वालों को ध्यान अन्तर्मुहूर्त तक हो सकता है। इसके अतरिक्त वह वीतराग, वीतद्वेष, निर्मोह, सर्वज्ञ-सर्वदर्शी, देवों द्वारा पूज्य, समवसरण में स्थित होकर धर्मदेशना करते हुए तथा परमात्मा से अभिन्न आत्मा का ध्यान करने वाला घ्याता समस्त कालुष्य से रहित होकर परमात्मतत्त्व को प्राप्त कर लेता है।

**ध्यान के प्रकार-**

आचार्यों ने अपने-अपने मतानुसार ध्यान को कई रूपों और विचारों के द्वारा प्रस्तुत किया है, तत्त्वार्थसूत्र में ध्यान के चार प्रकार कहे गये हैं-

**आर्त्तरौद्रधर्म्यशुक्लानि च ध्यानानि।**

आर्त्तध्यान, रौद्रध्यान, धर्म्यध्यान और शुक्लध्यान ये ध्यान के चार प्रकार हैं। इनमें से दो अशुभ हैं। उनसे पाप का बन्ध होता है। बाद के दो धर्म्यध्यान और शुक्लध्यान मोक्ष प्राप्ति के कारण होते हैं। ज्ञानार्णव के अनुसार ध्यान के तीन भेद भी देखने को मिलते हैं- (१) अप्रशस्त (२) प्रशस्त और (३) शुद्ध। यह प्रकारान्तर से चार भेदों का ही समर्थन करता है। ज्ञानार्णव में आर्त्तध्यान, रौद्रध्यान, को एक ही अशुभ ध्यान माना गया है (अप्रशस्त), धर्म ध्यान को स्वतंत्र प्रशस्त कहा गया है, शुक्लध्यान को शुद्ध ध्यान कहा है। आ. हेमचंद्राचार्य ने ध्यान का ध्याता, ध्यान और ध्येय के रूप में वर्गीकरण किया है, तथा ध्येय के चार प्रकार बताये है।

**१. आर्त ध्यान-** जैन आगमों के अनुसार, जब जीव अपने शरीर, इन्द्रियों या सांसारिक पदार्थों में आसक्ति रखता है और उनसे जुड़े दुःख, क्लेश, रोग, मोह आदि में उलझा रहता है तो यह आर्त ध्यान पीड़ाजन्य ध्यान कहलाता है। इसका स्वरूप पीड़ा, शोक, चिंता, मोह और असंतोष से भरा होता है। यह अशुभ ध्यान की श्रेणी में आता है। इससे आत्मा बंधन और दुःख में फँसी रहती है, मुक्ति की ओर नहीं बढ़ पाती।

**आर्त ध्यान के कारण-**

१. इष्ट वस्तु के विनाश का शोक - जैसे प्रिय वस्तु या प्रिय व्यक्ति के चले जाने पर शोक करना।

२. अनिष्ट वस्तु की प्राप्ति का क्लेश - जैसे अप्रिय परिस्थिति या रोग आने पर चिंता करना।

३. इन्द्रियों के भोग का मोह - इन्द्रिय-सुख में लिप्त होकर उससे छूटने पर कष्ट मानना।

४. भविष्य की चिंता - धन, परिवार या जीवन को लेकर लगातार चिन्तित रहना।

जैन शास्त्रों में कहा गया है कि जो साधक आर्त ध्यान करता है, वह आत्म-शुद्धि की बजाय और अधिक बंधन में फँसता है।

**२. रौद्र ध्यान-** क्रोधपूर्ण या हिंसात्मक ध्यान तब होता है जब जीव का मन हिंसा, छल, झूठ, चोरी, विषय-भोग या आसक्ति जैसी अशुभ वृत्तियों में लगा रहता है। इसका मूल स्वरूप क्रोध, मान (अहंकार), माया (छल) और लोभ से जुड़ा है। यह भी अशुभ ध्यान है, जो जीव को संसार में और गहरे बाँध देता है। जैन आगम और आचार्यों ने इसे चार भागों में बताया है, -

१. हिंसा रौद्र ध्यान - दूसरों को दुःख पहुँचाने, मारने, प्रताड़ित करने या हिंसा करने का भाव रखना।

२. मायारौद्र ध्यान - छल, कपट, झूठ, धोखा देने का भाव।

३. चौर्य रौद्र ध्यान - चोरी करने या दूसरों की वस्तु हथियाने का भाव।

४. परिग्रह रौद्र ध्यान - इन्द्रिय-विषयों में लिप्त होकर वासना और भोग-आसक्ति का भाव।

**रौद्र ध्यान का नियम (फल)-** यह जीव को नरक या तिर्यंच (पशुयोनि) की ओर ले जाने वाला ध्यान है। इससे अशुभ कर्मों का बंधन होता है। साधना, आत्म-शांति और मोक्ष की दिशा में यह सबसे बड़ी बाधा माना गया है। इसलिए जैन साधना में रौद्र ध्यान का त्याग अनिवार्य है।

३. धर्म ध्यान – जैन धर्म में धर्म ध्यान शुभ ध्यान है। जीव का मन आध्यात्मिक विषयों, आत्मा की शुद्धि, तत्त्वज्ञान, पाप से निवृत्ति और मोक्षमार्ग पर एकाग्र होता है, तब उसे धर्म ध्यान कहते हैं। यह आत्मा को बंधन से छुड़ाने वाला ध्यान है और मुक्ति की ओर ले जाता है।

धर्म ध्यान की विशेषता–इसमें चित्त शांत, स्थिर और पवित्र रहता है। साधक आत्मा और उसके स्वरूप का चिंतन करता है। यह शुभ कर्मों का बंधन करता है और जीव को उच्च गति (देव–गति या मनुष्य–गति) दिलाता है।

**धर्म ध्यान के चार भेद–** शास्त्रों में धर्म ध्यान के भी चार प्रकार बताए गए हैं–

१. आज्ञा–विचय – गुरु, शास्त्र और जिनवाणी की आज्ञाओं का चिंतन करना। (जैसे: पंचमहाव्रत, संयम, नियमों पर ध्यान)।

२. अपाय–विचय – पापों और अशुभ कर्मों के कारण होने वाले अपाय (नरक/तिर्यंच गति) पर विचार करना और उनसे बचने की भावना रखना।

३. विपाक–विचय – अपने कर्मों के फल (विपाक) का चिंतन करना – कि शुभ कर्म से सुख और अशुभ कर्म से दुःख मिलता है।

४. संस्थान–विचय – संसार के जीवों की अवस्थाओं (संस्थान) का चिंतन करना – कौन–सा जीव कहाँ जन्म लेता है, किस गति में कैसे भटकता है।

**धर्म ध्यान का फल (नियम)–**

✻ यह पुण्य और शुद्धि का कारण है।

✻ इससे मनुष्य और देव गति की प्राप्ति होती है।

आगे चलकर यह शुक्ल ध्यान (मोक्षदायी ध्यान) की ओर ले जाता है।

**४. शुक्ल ध्यान–** जैन धर्म में शुक्ल ध्यान शुद्धतम ध्यान है। जब जीव का मन पूर्णत: निर्मल, निष्कलंक और आत्मस्वरूप में स्थिर हो जाता है, तब यह ध्यान होता है। इसमें न तो आसक्ति है, न राग–द्वेष, न मोह–माया। यह केवल आत्मा के सच्चे स्वरूप में लीन होने का ध्यान है। इसे मोक्ष का साधन कहा गया है। आचार्यों ने शुक्ल ध्यान को भी चार भागों में विभाजित किया है, –

१. पृथक्त्ववितर्क –शुक्ल ध्यान– अनेक वस्तुओं का शुद्ध रूप में पृथक्–पृथक् चिंतन करना।

२. एकत्ववितर्क –शुक्ल ध्यान– सबमें एक समान आत्मस्वरूप का चिंतन करना।

३. सूक्ष्मक्रिया–शुक्ल ध्यान– अत्यंत सूक्ष्म और पवित्र चित्त के साथ आत्मा का अनुभव करना, जैसे केवल आत्मा के गुणों में रमण करना।

४. व्युपरत–क्रियानिवर्तिनी शुक्ल ध्यान– पूर्णत: स्थिर होकर केवल आत्मा में स्थित हो जाना। यही कैवल्य ज्ञान जहाँ आत्मस्थिरता का वर्णन मिलता है।

**आसन और आत्मस्थिरता–**

ध्यान, योग में आसन के अर्थ में बताया गया है– सुख पूर्वक पर्यंकासन में बैठना, शरीर को निश्चल करके अपनी गोदी में बाएँ हाथ पर दाहिना हाथ रखें, नेत्र न खुले हुए हो न बंद हो, कमर सीधी हो, निश्चल मूर्ति गम्भीर गर्दन, प्रसन्न मुख, अनिमेष स्थिर सौम्यदृष्टि, निद्रा, आलस्य, कामराग, रति, अरति, शोक, हास्य, भय, जुगुप्सा, द्वेष, विचिकित्सा आदि को छोड़कर मन्द–मन्द श्वासोच्छ्वास लेना शरीर के किसी भी अवयव पर अभ्यास अनुसार चित्तवृत्ति को स्थिर करके प्रशस्त ध्यान का प्रयत्न करना। नियम शब्द प्रयुक्त किया है। समस्त बाह्य–आभ्यन्तर परिग्रह से रहित आत्मा अपनी आत्मा को अपनी आत्मा के द्वारा ध्याता है, एवं कर्म और नोकर्म को नहीं ध्याता है, ऐसा गुणविशिष्ट आत्मा एकत्व का चिन्तन अनुभव करता है। वह आत्मा अपनी आत्मा का ध्यान करता हुआ दर्शन–ज्ञानमय हुआ और अनन्यमय हुआ थोड़े ही काल में कर्मों से रहित आत्मा को प्राप्त कर लेता है। आचार्य जी ने मन की मलीनता को मिटा कर ध्यान योग के द्वारा अपनी आत्मा की शुद्धि करने का उपाय करते हुए कहा है,– वीतराग, वीतद्वेष, निर्मोह,

सर्वज्ञ–सर्वदर्शी, देवो द्वारा पूज्य, समवसरण मे स्थित होकर धर्मदेशना करते हुए तथा परमात्मा से अभिन्न आत्मा का ध्यान करनेवाला ध्याता समस्त कालुष्य से रहित होकर परमात्मतत्त्व को प्राप्त कर लेता है।

**निष्कर्ष–**


आज के तनावपूर्ण और असंतुलित जीवन में ध्यान, योग और आत्मस्थिरता का अभ्यास मानसिक शांति, तनाव–निवारण और आंतरिक शक्ति के लिए आवश्यक है। ध्यान साधक को भीतर की ओर ले जाता है, जहाँ आत्मा की स्थिरता का अनुभव होता है। ध्यान, योग आत्मा को बाहरी विक्षेपों से मुक्त करके समता और शांति की ओर ले जाता है। प्राकृत साहित्य में वर्णित ध्यान पद्धति एक शाश्वत मार्गदर्शन प्रदान करती है। प्राकृत साहित्य में ध्यान, योग और आत्म–स्थिरता का विवेचन केवल दार्शनिक चिंतन नहीं, बल्कि जीवन जीने की एक व्यावहारिक पद्धति है। ध्यान से आत्म–स्थिरता प्राप्त कर साधक न केवल आध्यात्मिक उन्नति करता है, बल्कि जीवन में संतुलन, शांति और समरसता भी स्थापित करता है। आधुनिक युग की चुनौतियों के बीच यह साधना और भी अधिक आवश्यक और प्रासंगिक सिद्ध होती है।

**सन्दर्भ –**


१) भावसंग्रह आचार्य देवसेन, ६१९
२) योगदर्शन, पतंजलि, तृतीयविभूतिपादः, श्लोक–२, दर्शन योग महाविद्यालय, गुजरात
३) योगदर्शन, पतंजलि तृतीयविभूतिपादः, पृ. २१६, दर्शन योग महाविद्यालय, गुजरात
४) धम्मपद, भिक्षुधर्मरक्षित, २५/१२, वाराणसी
५) धम्मपद, भिक्षुधर्मरक्षित २५/१३, वाराणसी
६) तत्त्वार्थसूत्र, उमास्वामी, ९/२७, सम्पा. पं. कैलाश चन्द्र शास्त्री, मध्यप्रदेश
७) नियमसार, आ. कुंदकुंद, व्यवहारचरित्र अधिकार, ६८–६९, प्र. दिगम्बर जैन शोध संस्थान, वाराणसी
८) प्रवचनसार, ३/१५४
९) योगशास्त्र, आ. हेमचन्द्र, सप्तम प्रकाश, गाथा–१, प्रकाशक– ऋषभचन्द्र जौहरी, किशनलाल जैन, दिल्ली, १९६३
१०) तत्त्वार्थसूत्र, उमास्वामी, ९/२७, जैन विद्यापीठ, सागर, मध्य प्रदेश, सं. २०१७
११) योगशास्त्र, आ. हेमचन्द्र, पृ. २३४, प्रकाशक ऋषभचन्द्र जौहरी, किशनलाल जैन, दिल्ली, १९६३
१२) तत्त्वार्थसूत्र, उमास्वामी , ९/२८, जैन विद्यापीठ, सागर, मध्य प्रदेश, सं. २०१७
१३) सर्वार्थसिद्धि, आ. पूज्यपाद, पृ. ३५१, भारतीय ज्ञानपीठ, इंस्टीट्यूशनल एरिया, नई दिल्ली, २००६
१४) ज्ञानार्णव, आ. शुभचन्द्र, ३/२७–२८, जैन संस्कृति संरक्षक संघ, सोलापुर, १९७७
१५) योगशास्त्र, आ. हेमचन्द्र, पृ. २२४, प्रकाशक ऋषभचन्द्र जौहरी, किशनलाल जैन, दिल्ली, १९६३
१६) स्थानांगसूत्र, मधुकर मुनि, चतुर्थ स्थान, प्रथम उद्देश– ६०–६२, आगम प्रकाशन समिति, ब्यावर, राजस्थान
१७) सर्वार्थसिद्धि, आ. पूज्यपाद, ९/३५, भारतीय ज्ञानपीठ, इंस्टीट्यूशनल एरिया, नई दिल्ली,२००६
१८) योगशास्त्र, आ. हेमचन्द्र, पृ. २५७–२५९, प्रकाशक ऋषभचन्द्र जौहरी, किशनलाल जैन, दिल्ली, १९६३
१९) नियमसार, ५/८९
२०) तत्त्वार्थसूत्र, उमास्वामी, पृ. ३४६, प्र.–आ. आदिसागर अंकलीकर अन्तर्राष्ट्रिय जागृति मंच, मुम्बई
२१) समयसार, आ. कुंदकुंद, ६/१८९,भारतीय ज्ञानपीठ, दिल्ली
२२) योगशास्त्र, आ. हेमचन्द्र, पृ. २३४, प्रकाशक ऋषभचन्द्र जौहरी, किशनलाल जैन, दिल्ली, १९६३


*****

# प. पू. आचार्य १०८ श्री वर्धमानसागरजी महाराज (दक्षिणवाले) यांची सातिशय सल्लेखना



**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध सिद्धक्षेत्र श्री कुंथलगिरी येथे बाहुबली गुरुकुलाचे स्नातक प. पू. आचार्य १०८ श्री वर्धमानसागरजी महाराज यांनी दि. ५ जुलै २०२६ रोजी रात्री ११ वाजून ३४ मिनिटांनी अत्यंत भद्र परिणामपूर्वक समाधी साधली. त्यांचा हा सल्लेखना महोत्सव लाखो भाविकांनी प्रत्यक्ष पाहिला. त्यांची यमसल्लेखना तेरा दिवसापासून सुरू होती. आगम चक्रवर्ती आचार्य १०८ श्री विद्यासागरजी महाराज यांच्या व अन्य त्यागीगणांच्या मंगल सानिध्यामध्ये हा मृत्युमहोत्सव संपन्न झाला.

आचार्य श्री वर्धमानसागरजी महाराज यांचे गृहस्थ अवस्थेतील मूळ नाव श्री. पायगोंडा पाटील असे होते. निमशिरगाव येथे १ जानेवारी १९५१ साली त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण निमशिरगाव (ता. शिरोळ) येथेच घेतले. त्यानंतर इयत्ता पाचवी ते अकरावी म्हणजे त्याकाळचे मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण बाहुबली गुरुकुलात घेतले. तेव्हा परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज व अन्य अनेक त्यागीगणांचे मंगल आशीर्वाद, प्रेरणा, मार्गदर्शन लाभले. या बालपणीच्या सत्संस्काराचे बीजारोपण बाहुबली गुरुकुलात घडल्यानेच त्यांचे हे संस्काररूपी वटवृक्ष संपूर्ण समाजाला व जगाला मार्गदर्शक ठरले.

महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यावर इचलकरंजी येथे हाडाचे शिक्षक म्हणून ते एक आदर्श शिक्षक ठरले. सेवाकाळात देखील सातत्याने स्वाध्याय व आत्मचिंतन करीत होते. सेवानिवृत्तीनंतर २००२ साली त्यांनी ब्रह्मचर्य व्रत स्वीकारले. २००४ साली इचलकरंजी येथे वात्सल्यमूर्ती आचार्य १०८ श्री सन्मतीसागर महाराज यांच्या शुभहस्ते भगवती जैनेश्वरी नग्न दिगंबर दीक्षा धारण केली. २०१३ साली कोथळी येथे त्यांना आचार्य पद देण्यात आले.

बाहुबली क्षेत्रावर त्यांची नितांत श्रद्धा होती. गुरुकुलातील मुलांच्या विषयी आपुलकी व जिव्हाळा खरोखरच प्रशंसनीय होता. शिखरजीकडे ससंघ विहार करण्यापूर्वी आणि सल्लेखना घेण्यासाठी कुंथलगिरी येथे विहार करण्यापूर्वी त्यांनी बाहुबली क्षेत्राचे दर्शन घेतले होते.

२०१५ साली दुधगाव येथील चातुर्मासानंतर त्यांची प्रकृती खूपच खालावलेली होती. सम्मेद शिखरजीला संघ सहित विहार करण्याचा मानस होता, पण ते घडले नाही. प्रकृती इतकी ढासळली होती की त्यांनी कित्येक वेळा बोलून दाखवले की आता मी सल्लेखना घेतो, परंतु बाहुबली येथे दोन महिने वास्तव्य केल्याने त्यांना पूर्वीप्रमाणे स्वास्थ लाभले. याविषयी ते नेहमी कृतज्ञतापूर्वक आदराने उल्लेख करीत असत. विशेष करून आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी म्हणजे त्याकाळी असलेल्या ब्र. सुजाताताई यांच्याविषयी त्यांना अपार आस्था होती. त्यानंतर त्यांनी दोन वेळा संघासहित शिखरजीची यात्रा संपन्न केली. त्यांच्या संघातील तीसहून अधिक महाराजांनी बाहुबली गुरुकुलात शिक्षण घेतले आहे. म्हणून ते नेहमी म्हणत असत की बाहुबली गुरुकुल ही संस्कारांची खाण आहे. ही एक मानव घडविणारी सुंदर प्रयोगशाळा आहे. म्हणून ते येथील कार्यकर्त्यांची

आस्थापूर्वक चौकशी करून त्यांना धर्ममार्गावर स्थिर राहण्यास सातत्याने प्रेरणा देत होते. त्याशिवाय त्यांच्या संघातील आगमचक्रवर्ती आचार्य श्री विद्यासागरजी महाराज यासारख्या अनेक त्यागीगणांना या ठिकाणी वास्तव्य करून विद्याध्ययन करण्यास सत्प्रेरणा दिली होती.

अत्यंत भद्र व शांत परिणामांनी त्यांनी सल्लेखना साधून आपला मानव जन्म सार्थक केला आहे. त्यांना शीघ्रतेने मोक्षलक्ष्मी प्राप्त होवो, हीच बाहुबली गुरुकुल परिवारातर्फे विनयपूर्वक आदरांजली.

*****

*** समडोळीच्या वर्षाराणी पाटीलची संघर्षमय कहाणी...**



# एका रात्रीत वडील, मामा, आजोबा गमावले तरीही बनल्या एसीपी

**दिनेशकुमार ऐतवडे, ९८५०६५२०५६**

सन १९८७... समडोळीच्या इतिहासातील एक काळी रात्र ! रात्र नेहमीप्रमाणे गावावर अलगद उतरली होती. समडोळी गाव गाढ झोपेत होते. घराघरांतील दिवे मालवले होते. फक्त स्टँड परिसरात मात्र कुजबुज सुरू होती. त्या कुजबुजीत एका भीषण वादळाची चाहूल दडली होती. पलूस तालुक्यातील ब्रह्मनाळ गावातील राजोबा-गडदे वैर विकोपाला पोहोचले होते. त्या वैराची धग समडोळीपर्यंत पोहोचेल, याची कल्पना कोणालाच नव्हती. आणि अचानक बंदुकीच्या गोळ्यांनी रात्रीची शांतता चिरली

स्टँडजवळील एका घरात घुसून गडदे गटाने राजोबा गटातील तिघांवर गोळीबार केला. काही क्षणांत तीन जीव कायमचे शांत झाले.

त्या काळात मोबाईल नव्हते, सोशल मीडिया नव्हता, माहिती पोहोचण्याची साधने नव्हती. सकाळचा सूर्य उगवला आणि त्याच्यासोबत संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या तिघांमध्ये एका लहान मुलीचे वडील, मामा आणि आजोबा होते.

ती मुलगी म्हणजे पुढे महाराष्ट्र पोलीस दलात आपल्या धाडसी कार्याने ओळख निर्माण करणाऱ्या सौ. वर्षाराणी जीवंधर पाटील (पूर्वाश्रमीच्या वर्षाराणी रावसाहेब चव्हाण).

त्या वेळी वर्षा अजून लहान होती. दुःख म्हणजे काय, हे समजण्याचेही वय नव्हते. पण नियतीने एका दिवसात तिच्या डोक्यावरची तीन छत्रे हिरावून घेतली. घर उद्ध्वस्त झाले. कुटुंब पोरके झाले. गाव सुन्न झाले. पण नियतीसमोर हार मानणे तिच्या रक्तात नव्हते. डोळ्यांत अश्रू होते, पण मनात जिद्द होती. परिस्थिती अत्यंत बेताची होती. शेती, जनावरे, संसार आणि शिक्षण या सर्वांचा भार पेलत तिने आयुष्याशी दोन हात केले.

प्राथमिक शिक्षण मराठी मुलींच्या शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण समडोळी हायस्कूल आणि आरवाडे हायस्कूलमध्ये पूर्ण केले. पुढे के. डब्ल्यू. सी. कॉलेज, सांगली येथून एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

लहान वयातच विवाह झाला. सातवीत असतानाच तिचा विवाह झाला. पती श्री. जीवंधर पाटील हे अभियंता आहेत. सासर वाळवा येथे आहे. आई पुष्पावती चव्हाण आणि वडील शिक्षक असल्याने शिक्षणाचे संस्कार लाभले. पण लग्नानंतर अवघ्या सहा महिन्यांत वडील, मामा आणि आजोबा यांची हत्या झाल्याने आयुष्याने पुन्हा

एकदा कठोर परीक्षा घेतली. तरीही तिने परिस्थितीला शरण न जाता शिक्षणाची वाट धरली.

सन १९९७मध्ये तिने एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली. नाशिक येथे प्रशिक्षण पूर्ण करून तिची पहिली नियुक्ती मुंबईतील मालाड पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक (PSI) म्हणून झाली.

कर्तव्यनिष्ठा, धाडस व प्रामाणिकपणामुळे वरिष्ठांचा तिच्यावर विश्वास बसला. भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या कन्येच्या अंगरक्षकाची जबाबदारीही तिने यशस्वीपणे सांभाळली.

सांगली, मिरज, पुणे, पिंपरी-चिंचवड, औरंगाबाद अशा विविध ठिकाणी तिने उल्लेखनीय सेवा बजावली. औरंगाबादच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील कामामुळे तिला लेडी सिंघम अशी ओळख मिळाली.

देहूरोड आणि आळंदी येथे ट्रॅफिक विभागात कार्यरत असताना लाखो वारकऱ्यांच्या एकादशी पालखी सोहळ्याचा बंदोबस्त तिने अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीपणे सांभाळला.

आज त्या पालघर येथे आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) म्हणून कार्यरत आहेत.

या यशामागे अनेकांचे मोलाचे योगदान आहे. आई पुष्पावती चव्हाण, पती जीवंधर पाटील, घाटगे कोचिंग क्लासेसचे श्री. घाटगे सर, समडोळी हायस्कूलचे दिवंगत पी.ई. शिक्षक बी. बी. खोत, श्रीकांत गर्जे यांचे मार्गदर्शन लाभले. तर समडोळीचे ज्येष्ठ नागरिक बाळासाहेब चिट्टे पाटील (दादा) यांनी आष्टा पीपल्स बँकेच्या माध्यमातून दिलेले आर्थिक सहकार्य तिच्या आयुष्यातील महत्त्वाचा आधार ठरले.

वर्षाराणी पाटील यांचा जीवनप्रवास हा केवळ एका पोलीस अधिकाऱ्याचा प्रवास नाही; तो राखेतून उगवलेल्या फिनिक्स पक्ष्याची कहाणी आहे.

ज्या मुलीने लहानपणी एका दिवसात वडील, मामा आणि आजोबा गमावले, त्याच मुलीने दुःखाला शक्तीत, अश्रूंना जिद्दीत आणि संघर्षाला यशात बदलून दाखवले.

समडोळीच्या त्या काळ्या रात्रीने एका कुटुंबाचा आधार हिरावला; पण त्याच रात्रीने महाराष्ट्राला एक कर्तव्यदक्ष, निडर आणि जनतेसाठी झटणारी महिला पोलीस अधिकारी दिली.

ही कहाणी प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी आहे. कारण परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, शिक्षण आणि प्रामाणिक परिश्रम यांच्या बळावर नियतीलाही हरवता येते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे एसीपी वर्षाराणी जीवंधर पाटील.

---

**वियोग वार्ता-** **श्रीमती मंगला बाबुराव शिरोशी-पाटील, कोल्हापूर**



श्रीमती मंगला बाबुराव शिरोशी यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८७व्या वर्षी दि. २३ जून २०२६ रोजी निधन झाले. त्या स्तवनिधी या गुरुकुलातील विद्यार्थ्यांना अनेक वेळा भोजन दिले आहे. बाहुबली क्षेत्रावरील महामस्तकाभिषेक व इतर पूजेसाठी त्यांनी दानराशी दिली आहे. कुंथुगिरी क्षेत्रावर अतिथी निवास बांधले आहे. कोल्हापूर येथे मंगला फर्निचर एजन्सी या नावाने गेल्या ५० वर्षापासून उत्तम व्यवसाय करीत आहेत. मंगला एजन्सी तर्फे स्तवनिधी गुरुकुल, कोल्हापूर जैन मठ, शाहुपुरी दिगंबर जैन मंदिर, जैन बोर्डिंग अशा अनेक ठिकाणी मंदिरातील स्वाध्यायासाठी स्टीलचे कपाट आणि गंधोदक घेण्यासाठीचे फर्निचर त्यांनी देऊ केले आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र संतोष, सौ. किशोरी, त्यांची कन्या सुरेखा शंकरगोंडा आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, हीच सद्भावना!

- डॉ. अशोक नाईक, बाहुबली

**विशेष वार्ता –**

## राष्ट्रीय स्तरावरील तीर्थंकर ऋषभदेव आलेख स्पर्धेत श्री.पवन उखळकर यांना तृतीय क्रमांक



अखिल भारतवर्षीय धर्म जागृती संस्थान युवा प्रकोष्ठ (दिल्ली) यांच्या वतीने जैन आचार्य श्री वसुनंदीजी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील तीर्थंकर ऋषभदेव आलेख (निबंध) स्पर्धेत **कारंजा–लाड येथील श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूलचे सहाय्यक शिक्षक श्री. पवन उखळकर** यांनी देशभरातून तृतीय क्रमांक प्राप्त करून संस्थेचे, शहराचे व विदर्भाचे नाव उज्ज्वल केले आहे.

भगवान ऋषभदेव यांचे जीवनकार्य, मानवहितासाठी त्यांनी दिलेले योगदान, अहिंसेचा संदेश, नारीशक्तीचा गौरव तसेच भारतीय संस्कृतीवरील त्यांच्या प्रभावासारख्या विविध विषयांवर आधारित या राष्ट्रीय स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधून सुमारे सहाशेहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत चुरशीच्या आणि उच्च दर्जाच्या या स्पर्धेत श्री. पवन उखळकर यांनी संपूर्ण भारतातून तृतीय क्रमांक पटकावला.

या यशाबद्दल त्यांना पारितोषिक म्हणून रुपये २१,००० रोख रक्कम व सन्मानचिन्हासह प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य संयोजक अंशूल जैन (दिल्ली), राष्ट्रीय अध्यक्ष गौरव जैन (दिल्ली), राष्ट्रीय महामंत्री अंकुर जैन तसेच कोलकाता येथील अनेक जैन समाजबांधव व मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पवन उखळकर यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन करून त्यांच्या पुढील साहित्यिक व वैचारिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्री. पवन उखळकर यांना यापूर्वीही विविध राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील निबंध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त झाले आहे. मराठी विज्ञान परिषद (मुंबई) द्वारा आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत विदर्भातून प्रथम क्रमांक, भगवान महावीर स्वामी आंतरराष्ट्रीय निबंध स्पर्धा, किशनगड (राजस्थान) येथे विशेष पारितोषिक, तसेच अरिहंत जागृती मंच(पुणे) द्वारा आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक अशी अनेक मानाची पारितोषिके त्यांनी प्राप्त केली आहेत.

आपल्या या यशामागे श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल संस्था तसेच संस्थाद्वारा संचलित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझमचे मार्गदर्शन, शाळेतील सहकारी शिक्षकांचे सहकार्य तसेच कुटुंबियांचे प्रोत्साहन आणि पाठबळ यांचा सर्वाधिक वाटा असल्याचे पवन उखळकर यांनी नमूद केले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## प्राकृत विद्या शिबिर संपन्न

भारताची प्राचीनतम अभिजात प्राकृत भाषेच्या संवर्धन हेतू संस्थापित प्राकृत भाषा विकास फाउंडेशन आणि भगवान महावीर २५००वा मुक्ति महोत्सव मंडळ, डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५/६/२०२६ ते १/७/२०२६ या कालावधीत प्राकृत विद्या शिक्षण शिबीराचे आयोजन डोंबिवली धर्मनगरीमध्ये प्रथमच केले गेले. शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला.

शिबीरात ३५ शिबीरार्थींचा (११ पाठशाळा विद्यार्थी आणि २४ प्रौढ स्त्री–पुरुष) सहभाग होता.

भगवान महावीर २५००वा मुक्ति महोत्सव मंडळाच्या अध्यक्षा सौ. संगीता सतीश पेठकर, श्रीमती अनुपमा नेमीसागर अंबुडकर, सौ. दीप्ति अमोल खंडारे यांनी शिबिराचे संयोजन केले.

शिबिरात सर्व भाषांची जननी अतिप्राचीन प्राकृत भाषा आणि ब्राह्मी लिपीचे प्राथमिक ज्ञान, प्राकृत विज्ञान, द्रव्यसंग्रह (जीवाधिकार) ग्रंथ व ब्राह्मी ब्राह्मी लिपीची बाराखडी शिकवली. प्राकृत चोवीस तीर्थंकर स्तुती, सिद्धभक्ती आणि पंचमहागुरु भक्ती अर्थासह म्हणायला शिकवली. शिबिरार्थींनी ऑन लाइन क्लासेसच्या माध्यमातून आम्हाला प्राकृत शिकवा अशी विनंती केली.

### श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठाचा ९२वा वर्धापनदिन सोहळा उत्साहात संपन्न

दि. १६ जुलै २०२६ रोजी श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठ, बाहुबली यांच्या ९२व्या वर्धापनदिनानिमित्त आषाढ शुद्ध द्वितीया, गुरुवार १६ जुलै रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक व संस्कारप्रधान कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. आचार्यश्री शांतिसागरजी महाराज प्रवचन हॉल, बाहुबली येथे हा वर्धापनदिन सोहळा अत्यंत भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यास आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, मुनिश्री सुयोगसागरजी महाराज, मुनिश्री सहिष्णुसागरजी महाराज, आर्यिका श्री अनुश्रुतमती माताजी, आर्यिकाश्री शुद्धोऽहंश्री माताजी, आर्यिकाश्री संवित्तिश्री माताजी, आर्यिकाश्री सुदृष्टीश्री माताजी, क्षुल्लकश्री सुभद्रसागरजी महाराज तसेच क्षुल्लिकाश्री सुधृतिश्री माताजी यांचे मंगल सान्निध्य लाभले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता जिनेंद्र अभिषेक व पूजनाने झाली. त्यानंतर '**विद्यारंभम् करिष्यामि**' या सुक्तीप्रमाणे गुरुकुलातील विद्यार्थ्यांवर संस्कारविधी त्यागी गणांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संचालक, गोमटेश बेडगे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. गुरुकुल शिक्षणपद्धतीचे महत्त्व, विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीसाठी आवश्यक असलेले संस्कार आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी बालविकास विद्यामंदिर, बाहुबली यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'भद्रदास दिनदर्शिकेचे' मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विद्यार्थी मनोगतामध्ये शिशुवर्गातील प्रिशा चौगुले, माध्यमिक विभागातील इयत्ता नववीची विद्यार्थिनी स्वरा लांडे हिने गुरुकुल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात होणाऱ्या सकारात्मक बदलांविषयी विचार मांडले.

मंगल आशीर्वचनात परमपूज्य १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी यांनी आचार्य समंतभद्र महाराजांनी दिलेल्या शिकवणीचे प्रत्यक्ष जीवनात आचरण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. गुरुकुल परंपरा ही भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून ती जतन करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे, असे त्यांनी सांगितले.

त्यानंतर परमपूज्य आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांनी विद्यार्थ्यांनी गुरुकुलात शिक्षण घेण्याचे महत्त्व विशद केले. नैतिक शिक्षणाबरोबरच धार्मिक, संस्कारमूलक आणि व्यावहारिक शिक्षण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. आधुनिक शिक्षणासोबत मूल्यशिक्षणाची जोड दिल्यास समाजात सुसंस्कृत, चारित्र्यवान आणि जबाबदार नागरिक घडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास उपसंचालक प्रकाश नाईक, तात्यासाहेब अथणे, ऋषभनाथ मलिकवाडे, सुरेश चौगुले, संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, गुरुकुल स्नातक, विद्यार्थी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी मेरी भावना या प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

|| न धर्मो धार्मिकैर्विना ||



# श्री. महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) द्वारा संचालित गुरुदेव समंतभद्र सेंटर फॉर जैनिझम अंतर्गत

# * कृतज्ञता ज्ञापन समारोह *

## शनिवार दि. २२ ऑगष्ट २०२६



श्रद्धेय स्व.ब्र.श्री. माणिकचंद्रजी चवरे (तात्याजी)

प.पू. गुरुदेव श्री. समंतभद्र महाराज यांचे सत्शिष्य व सर्व गुरुकुल संस्थांचे आधारस्तंभ श्री. महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) चे अधिष्ठाता **श्रद्धेय स्व.ब्र.श्री.माणिकचंद्रजी चवरे (तात्याजी)** व श्री.बाहुबली ब्रह्मचर्याश्रमचे अधिष्ठाता **श्रद्धेय स्व.ब्र.श्री.माणिकचंदजी भिसीकर** यांच्या समर्पित जीवन कार्याचा गौरव करण्यासाठी कृतज्ञता ज्ञापन समारोह आयोजित करीत आहोत.



श्रद्धेय स्व.ब्र.श्री. माणिकचंदजी भिसीकर

### * आमंत्रित वक्तागण *

* पू. आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी (व्हीडिओ रेकॉर्डिंगद्वारा)
* श्री. जीवेंद्र जडे, बाहुबली कुंभोज
* डॉ. रावसाहेब पाटील, सोलापूर
* डॉ. श्री. नेमिनाथजी शास्त्री, बाहुबली
* डॉ. श्री. आलोकजी शास्त्री, कारंजा लाड
* डॉ. सौ.लीना चवरे,कारंजा लाड
* श्री. भरतजी भोरे, कारंजा लाड
* सुश्री. प्रज्ञा डोणगावकर, कारंजा लाड
* श्री. अमलप्रभ चवरे, कारंजा लाड
* श्री. प्रकाश सरोदे, मुख्याध्यापक, श्री. म. ब्र. हायस्कूल, कारंजा लाड
* श्री. प्रकाश टोपरे
* सौ. वृंदा मेहता, नासिक

## रविवार दि.२३ ऑगष्ट २०२६

### नवनिर्मित विद्वत् / शोधार्थी निवास व ग्रंथालय (श्रुतदीपक भवन) उद्‌घाटन समारोह



विद्वत् / शोधार्थी निवास

### * विद्वत् सान्निध्य *

विदुषी पं.विजयाताई भिसीकर, कारंजा-लाड

डॉ. श्री. विरागजी शास्त्री

### * प्रमुख अतिथी *

* श्री. सतीशजी संगई, अध्यक्ष, श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा लाड
* श्री. राजेन्द्रजी गांधी, मुंबई
* श्री. धर्मेंद्रजी सेठ रईस, खुरई
* श्री. दिनेशजी गंगवाल, छ.संभाजीनगर
* श्री. उदयजी गहाणकरी, नागपूर
* श्री. प्रियदर्शनजी गहाणकरी, नागपूर
* श्री. प्राजक्तजी मेहता, नासिक
* श्री. भव्यभाई मेहता, मुंबई
* श्री. विलासजी पाटणी, अकोला
* सौ.विजयाताई नांदगावकर, कारंजा लाड
* श्री. प्रकाश आदिनाथ नाके, चिखली
* श्री. विवेक भोरे, कारंजा लाड

तरी या समारंभास आपण अवश्य उपस्थित रहावे, ही विनंती..!!

**संपर्क**

| कीर्तिकुमार भोरे | प्रज्ञा डोणगांवकर | प्रमोद चवरे | भरत भोरे | परिमल रुईवाले | डॉ.आलोक शास्त्री |
|---|---|---|---|---|---|
| ९४२२९४४२२९ | ९८८१९००६७२ | ९४२१७४५०१५ | ९४२१७९२८३० | ९३७११७३६८२ | ९३७३७१८००३ |

**शनिवार - रविवार दि. २२-२३ ऑगष्ट २०२६**

**स्थळ : श्री. महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल), वीरवाडी, कारंजा (लाड)**

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-07-2026

# बाहुबली संस्थेचा ९२वा वर्धापनदिन

(विशेष वार्ता पृष्ठ क्र. ४२वर)



बाहुबली संस्थेच्या वर्धापन दिनप्रसंगी उपस्थित आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज व त्यांचा संघ





बाहुबली संस्थेच्या वर्धापन दिनप्रसंगी प्राथमिक विद्यामंदिरची भद्रदास ही दिनदर्शिका प्रकाशित करताना आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, श्री. तात्यासाहेब अथणे, श्री. वृषभनाथ मलिकवाडे, बालचमू व अध्यापक वर्ग

## ✻ आगामी कार्यक्रम ✻



श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे
**प. पू. गुरुदेव १०८**
**श्री समंतभद्र महाराज**
**यांचा ३८वा समाधिदिवस**
**श्रावण शुद्ध पंचमी,**
**सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६**

तरी या दिवशी आपण अत्यंत आनंदाने व भक्तिभावाने त्यांचे गुणानुवाद करावे आणि गुरुकुलरूपी वृक्षाचे संरक्षण व संवर्धन याकरिता यथाशक्ती सहयोग द्यावे. तसेच कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे.

## विनम्र अभिवादन !!!



सन्मति मासिकाचे संस्थापक–संपादक बा. ब्र. माणिकचंदजी भीसीकर (गुरुजी) यांची गुरुवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६ रोजी ११०वी जयंती येत आहे. त्यानिमित्त त्यांच्या निःस्पृह जीवनकार्यास विनम्र अभिवादन !!!

जन्म : ०१ ऑगस्ट १९१६ स्वर्गवास : २० एप्रिल २००३

प्रेषक, www.sanmatimasik.com
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर–४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

______________________

______________________

______________________

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-07-2026

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली